MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष चोविसावे / अंक ५ / मे २०२३

## संपादकीय

### उन्हाळी शिबिरे

शाळेला उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली की, शाळकरी मुलांसाठी उन्हाळी शिबिरांचे पेव फुटते. अनेक संस्था उन्हाळी शिबिरांची माहिती देऊन त्यांच्या शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन करतात. यातील काही शिबिरे स्वयंसेवी संस्थांनी आयोजित केलेली असतात. ती साधारणपणे निःशुल्क असतात किंवा अल्प शुल्कात आयोजित केलेली असतात. काही शिबिरे मात्र उत्पन्न कमविण्यासाठी आयोजित केलेली असतात. ते चांगलेच शुल्क आकारतात.

वर्षातील नऊ महिने विद्यार्थी शाळेच्या घाण्याला जुंपलेले असतात. शाळेत जाणे, शाळेचा अभ्यास करणे, शिकवणी वर्गाला जाणे, तिथे दिलेली कामे करणे यातच त्यांचा दिवस जातो. काही जणांना चित्रकलेची आवड असते, काहींना संगीताची आवड असते, तर काहींना वाचनाची आवड असते. दैनंदिन कामात आपला छंद जोपासण्यासाठी त्यांना फारसा वेळ मिळत नाही. उन्हाळ्याची सुट्टी ही त्यादृष्टीने उपयुक्त ठरते. तिचा पुरेपूर उपयोग करून घ्यायचा असेल तर, जिथे आपला छंद जोपासला जाईल अशाच शिबिराची निवड त्यांनी करावी आणि मिळालेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करून घ्यावा.

व्यक्तिमत्त्वविकास हे शालेय शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. परंतु शालेय अभ्यासक्रमात या बाबीला फारसा वाव मिळत नाही. याचे कारण अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर आणि परीक्षेचे नियोजन करण्यावर शाळा आपले लक्ष केंद्रित करतात. काही शाळांमध्ये अभ्यासक्रम पूरक कार्यक्रम आयोजित केले जातात. परंतु त्या बाबीला पुरेसा वेळ दिला जात नाही. काही शाळा शैक्षणिक सहलींचे आयोजन करतात. परंतु त्यातून फारसे साधत नाही. या दृष्टीने विचार करता उन्हाळी शिबिरांचे महत्त्व खूपच आहे. शिबिर आयोजित करणाऱ्या गटांनी या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे.

शिबिरात सहभागी होऊन नवनवीन गोष्टी शिकणे ही खरोखरच चांगली गोष्ट आहे. परंतु अनेक विद्यार्थ्यांना शिबिरात सहभागी होणे शक्य होत नाही. अशा मुलांनी निराश होण्याची गरज नाही. मिळालेल्या फावल्या वेळेचा

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आपल्या व्यक्तिमत्त्वविकासासाठी उपयोग करून घेणे त्यांनाही शक्य आहे. ही बाब आपोआप घडणारी नाही. त्यासाठी वेळेचे आणि कामाचे नियोजन करावे लागते. या संदर्भात माझा एक वैयक्तिक अनुभव सांगणे येथे सयुक्तिक ठरेल.

१९८० ते १९८६ या सात वर्षांच्या कालावधीत मी एका शैक्षणिक संशोधन प्रकल्पावर काम करीत होतो. ज्याच्या घरी शिक्षणाची परंपरा नाही अशा मुलामुलींना विज्ञान आणि गणित शिक्षणात कोणत्या अडचणी येतात हे समजून घेणे हे या प्रकल्पाचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. त्यासाठी मुंबई महापालिका शाळेत शिकणाऱ्या आणि परीक्षेत कमी गुण मिळालेल्या ४० विद्यार्थ्यांना निवडण्यात आले. ही मुले दर शनिवारी दुपारी आमच्या केंद्रात येत असत. त्यांच्याशी आंतरक्रिया करून त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचबरोबर त्या अडचणींवर मात कशी करावी यासाठी विशिष्ट शैक्षणिक पद्धत विकसित करण्यात आली. त्याला 'उपचारात्मक अध्यापन पद्धत' असे म्हणतात. ही पद्धत आता चांगलीच नावारूपाला आली आहे.

प्रकल्पातील विद्यार्थ्यांशी चर्चा करताना असे लक्षात आले की, सुट्टीचा उपयोग कसा करावा यादृष्टीने या मुलांकडे काहीही नियोजन नव्हते. ते टाळण्यासाठी त्यांना सुट्टीत सहज करता येतील अशी काही कामे सुचविण्यात आली. त्यातील एक काम होते ते हर्बेरिअम (Herbarium) बनविण्याचे. वनस्पती शास्त्रज्ञ या पद्धतीचा सर्रास वापर करतात. या पद्धतीत वनस्पतीचे वेगवेगळे भाग वाळवून एका कागदावर चिकटवून ठेवतात. उन्हाळी सुट्टीच्या निमित्ताने मुंबई शहरातील विद्यार्थी खेड्यापाड्यात आपल्या नातेवाईकांकडे जातात. तिथे त्यांना शहरात न बघितलेल्या अनेक वनस्पती पाहायला मिळतात. त्या वनस्पतींची पाने, फुले, देठ, फळे तोडून ती वाळविण्यासाठी उन्हात ठेवून देतात. हे भाग चांगले वाळले की ते एका जाड कागदावर चिकटवून हर्बेरिअम तयार केले जाते. त्यावर त्या वनस्पतींची माहिती लिहिली जाते. अशा प्रकारे प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारचे हर्बेरिअम बनवून आणले. त्यांच्या या कामामुळे त्यांना वेगवेगळ्या वनस्पतींची चांगली माहिती झाली.

आपल्या रोजच्या जीवनात विद्यार्थी अनेक लोकांच्या संपर्कात येतात. त्यांच्या व्यवसायाबद्दल विद्यार्थ्यांना कुतूहल वाटत असते. सहज चर्चा करून ते ही माहिती मिळवित असतात. हेच काम पद्धतशीरपणे कसे करावे हे मुलांना सांगण्यात आले. आपल्या आवडीच्या व्यक्तीला कसे गाठावे, कोणते प्रश्न विचारून त्या व्यक्तीच्या व्यवसायाविषयी माहिती मिळवावी, मिळालेल्या माहितीची नोंद कशी करावी, त्यांच्या आधारे मुलाखतीचा मसुदा कसा करावा याची जुजबी माहिती मुलांना देण्यात आली. कोणत्या व्यक्तीची निवड करावी आणि कोणते प्रश्न विचारावेत यांचे स्वातंत्र्य त्यांना देण्यात आले होते. या आवाहनाला देखील उत्तम प्रतिसाद मिळाला. प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. एका मुलीने खाजगी दवाखान्यात काम करणाऱ्या एका नर्सची मुलाखत घेतली. अनेक प्रश्न विचारून तिच्या व्यवसायातील खाचाखोचा तिने माहीत करून घेतल्या. त्या दोघांमध्ये झालेली चर्चा तिने सविस्तरपणे लिहून काढली. चर्चेच्या शेवटी नर्सने व्यक्त केलेली खंतदेखील तिने स्पष्टपणे मांडली. नर्सचे म्हणणे असे की, दवाखान्यात असेपर्यंत रोगी व्यक्ती आम्हाला 'सिस्टर' असे

(पृष्ठ क्र. ३ वर)

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष चोविसावे/अंक ५/मे २०२३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक ११ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | भारतातून चीनला गेलेले बौद्धधर्मप्रसारक (भाग - २) | जयंत कुलकर्णी | ३ |
| ३) | आवरण : एक आत्मावलोकनाचा लोलक | चन्द्रशेखर टिळक | ६ |
| ४) | स्थानिक इतिहासाचे दस्तऐवजीकरण | संकेत कुलकर्णी | १० |
| ५) | पद्मा गोळे : एका उजेडाचं स्मरण | प्रमोद वसंत बापट | १२ |
| ६) | सुरामेरय मज्जपमादठटाना वेरमणी सिक्खापदम् समादियामी। | प्रा. विनोद एच वाघ | १४ |
| ७) | 'जन ठायीं ठायीं तुंबला' | राम जगताप | १७ |
| ८) | भव शङ्करदेशिक मे शरणम् । | विनीता तेलंग | २३ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.

  **Email : vpmt1935@gmail.com**
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

– संपादक

# भारतातून चीनला गेलेले बौद्धधर्मप्रसारक

**(भाग - २)**

*भारतातून बौद्ध धर्माचा प्रचार चीनमध्ये झाला यासाठी काम केलेल्या बौद्ध धर्मप्रसारकांवर प्रकाश टाकणारा लेख - संपादक*

धर्मरक्षाबद्दल आपल्याला माहिती मिळते ती त्याच्या चरित्रावरून. हे चरित्र हे सहाव्या शतकाच्या सुरवातीस लिहिले गेले व अजूनही सेन्गीयु येथे जपून ठेवले आहे. त्याचे नाव आहे ''झु फाहू झुआन'' म्हणजेच ''धर्मरक्षाचे चरित्र''. हीच माहिती नंतर अनेक चिनी पुस्तकातून आपल्याला आढळते. पण त्याचे मूळस्थान हेच पुस्तक आहे. धर्मरक्षाबद्दल अभ्यास करताना आपल्याला याच चरित्रात्मक पुस्तकापासून सुरवात करावी लागेल.

धर्मरक्षचे पूर्वज हे युची जमातीचे होते. हे घराणे अनेक पिढ्या मध्य एशियातील चीनच्या सीमेवर असलेल्या डुनहुआंग या शहरात रहात होत्या. काही तज्ज्ञांचे म्हणणे असेही आहे की, हाही मगधाचा एक ब्राह्मण होता. खरे-खोटे माहीत नाही. तो कुठला होता हे महत्त्वाचे नसून त्याने काय काम केले हे महत्त्वाचे आहे. हे शहर म्हणजे चीनची अती पश्चिमेकडील सैन्याची वसाहत होती. (ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात). काहीच काळानंतर रेशीममार्गावरील (सिल्करुटवरील) ते एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र झाले. येथे आठ वर्षांचा असतानाच धर्मरक्षाने आपले घरदार सोडले व तो एका मठात दाखल झाला. तेथे त्याने एका गाओझुओ नावाच्या विदेशी श्रमणाकडे आसरा घेतला व शेवटी त्यालाच आपले गुरू मानले. धर्मरक्षचा हा गुरू बहुदा भारतीय असावा. हे नाव भारतीय श्रमणाचे कसे ? तर त्याचे उत्तर हे आहे की, त्या काळात भारतीय किंवा विदेशी नावांचे चिनीकरण करण्याची पद्धत सर्रास रूढ होती. या चिनी नावांमुळे खरी नवे शोधण्यास बऱ्याच इतिहासकारांना बरेच कष्ट करावे लागले हे मात्र खरे ! तर या श्रमणाकडे आसरा घेतल्यावर धर्मरक्षने खडतर मेहनत घेतली. असे म्हणतात की त्या वयात तो दिवसाला दहाहजार शब्द असलेले श्लोक म्हणायचा. तो मूळचाच अत्यंत बुद्धिमान व एकपाठी होता. त्या काळात म्हणजे अंदाजे काश्यप मातंगाच्या काळात चीनच्या राजधानीत मठ, देवळे, बुद्धाची चित्रे, हिनयान पंथांचे ग्रंथ यांचा बराच बोलबाला होता; पण महायान पंथाच्या सूत्रांचा अभ्यास मात्र पश्चिमी प्रदेशात होत असे. किंबहुना ही ''वैपुल्य सूत्रे'' राजधानीत माहीत असावीत की नाही अशी परिस्थिती होती. बौद्ध धर्माचे खरे तत्त्वज्ञान व मुक्तीचा खरा मार्ग याच पंथाच्या शिकवणीत दडलेला आहे याची खात्री असणारा धर्मरक्ष मग त्याच्या अभ्यासासाठी बाहेर पडला. त्याच्या गुरू बरोबर पश्चिमेकडील देश-विदेशांच्या यात्रेस त्याने प्रारंभ केला. असे म्हणतात की, त्या प्रवासादरम्यान त्याने ३६ भाषांचा व लिप्यांचा अभ्यास केला व त्यात लिहिलेल्या महायान सूत्रांचा खोलवर अभ्यासही केला. (यातील अतिशयोक्ती सोडली तर त्याने किती कष्ट घेतले हे यावरून कळते. त्या काळात एवढ्या भाषा त्या भागात बोलल्या जायच्या की नाहीत याची शंकाच आहे) हा त्यातील कुठल्याही श्लोकाचे उत्तमपणे विवेचन करू शकत असे.

हे सगळे ग्रंथ घेऊन मग तो चीनला पोहोचला. ''डुनहुआंग'' ते टँगची राजधानी ''चँग-ॲन'' या प्रवासात त्याने या ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर करण्याचे काम सुरू केले. त्याने ज्या संस्कृत/पाली सूत्रांचे चिनी भाषेत भाषांतर केले त्याची यादी पाहिल्यास मन थक्क होते.

भद्रकल्पिका, तथागतमहाकरुणानिर्देश, सद्धर्मपुंडरिक, ललितविस्तार, बुद्धचरितसूत्र, दशभुमीक्लेषचेदिकासूत्र, धर्मसमुद्रकोषसूत्र हे त्यातील काही ग्रंथ. एकूण ग्रंथ होते १४९. शिवाय त्याने अजून एक महत्त्वाचे काम केले ते म्हणजे बुद्धाच्या जातक कथांचे चिनी भाषेत भाषांतर केले. बरं हे नुसते लिहून तो थांबला नाही; तर गावोगावी, त्याच्या मठात त्याने या सूत्रांवर सतत प्रवचने दिली व धम्माचा प्रसार केला. चीनमधे जो काही बौद्धधर्म प्रारंभीच्या काळात पसरला त्याचे बरेचसे श्रेय धर्मरक्षालाच जाते.

अखेरच्या काळात धर्मरक्षाने वानप्रस्थाश्रम स्वीकारला व तो निर्जन जंगलात एकांतवासात रहाण्यास गेला. त्याच्या ज्ञानलालसेबद्दल एक दंतकथा याच काळात निर्माण झाली. तो ज्या नदीकिनारी रहात असे त्या नदीचे पाणी एक दिवस अचानक आटले. (एका माणसाने ते दूषित केले असेही म्हणतात) ते पाहून धर्मरक्ष त्या जंगलात विलाप करीत भटकू लागला, ''ही नदी अशी आटली तर मला जे काही थोडेफार पाणी लागते तेही मिळणे मुष्कील आहे'', हा आक्रोश ऐकताच ती नदी परत दुथडी भरून वाहू लागली. अर्थात ही एक बोधकथा आहे म्हणून आपण त्यातून काही बोध घ्यायचा असेल तर घेऊ व सोडून देऊ.

नंतरच्या काळात त्याने टँगची राजधानी चँग-ॲनच्या 'निल' वेशीबाहेर एक मठ स्थापन केला व तेथे महायानाचा अभ्यास करीत आपले आयुष्य व्यतीत करू लागला. त्याच्या शिष्यांची संख्या आता न मोजता येईल एवढी झाली होती. पण त्याचकाळात धर्मरक्ष सामान्यजनांमधे लोकप्रिय झाला तो एका घटनेमुळे...

त्याच्या विद्यार्थ्यांमधे एक श्रमण दाखल झाला होता. तो आठव्या वर्षीच श्रमण झाला होता याचाच अर्थ तो ज्ञानी असावा. ही घटना घडली तेव्हा त्याचे वय तेरा होते. त्याचे नाव होते झु-फाशेंग. चँग-ॲनमधे एक अत्यंत श्रीमंत व प्रतिष्ठित गृहस्थ रहात असे. एक दिवस तो धर्मरक्षाच्या मठात आला. त्याची गाठ या झुशी पडली. त्या माणसाने धर्मरक्षाकडे दोन लाख नाणी मागितली. त्या मागणीला धर्मरक्ष उत्तर देणार तेवढ्यात त्या लहान मुलाने उत्तर दिले, ''तुम्हाला ते पैसे मिळतील!'' ते ऐकून तो माणूस 'उद्या येतो' असे म्हणून निघून गेला. फा-शेंग म्हणाला, ''त्या माणसाला ते पैसे खरेच पाहिजे होते यावर माझा विश्वास बसला नाही. मला वाटते तो आपली परीक्षा घेण्यासाठी आला असावा.'' धर्मरक्षाने त्यालाही असेच वाटले असे उत्तर दिले. दुसऱ्या दिवशी तो माणूस आला व त्याने त्याच्या कुटुंबीयांसमवेत धर्माची दीक्षा घेतली.

जेव्हा क्सिओनू व क्सिन्बी टोळ्यांनी सम्राट हुईच्या राजधानीवर हल्ला केला त्या धामधुमीच्या काळात धर्मरक्षाने त्याच्या शिष्यांसह पूर्वेकडे पळ काढला. तेथे तो एका निसर्गरम्य कुन नावाच्या तळ्याकाठी पोहोचला. दुर्दैवाने झालेल्या दगदगीमुळे तो तेथे आजारी पडला व त्याने या जगाचा निरोप घेतला. त्यावेळी त्याचे वय होते ७८.

हुई आणि हुआई सम्राटांच्या मधल्या युद्धाच्या धामधुमीच्या काळातही हे भाषांतराचे काम अडखळत का होईना चालू होते. फा-जू नावाचा एक श्रमण होता त्याने लोकस्थान सूत्राचे भाषांतर केले. हा कुठून आला होता, त्याचे भारतीय नाव काय होते हे अज्ञात आहे. तसाच एक श्रमण होता त्याचे नाव होते फाल-ली. याने जवळजवळ १०० श्लोकांचे भाषांतर केले. हे दोघे आणि त्यांचे काम काळाच्या उदरात गडप झाले ते झालेच.

ही तत्त्वज्ञान व माहितीची देवाणघेवाण बघता, 'पूर्व आणि पश्चिम कधीच भेटणार नाहीत' हे प्रसिद्ध वाक्य खोटे ठरते. हे प्रदेश भेटले आणि मध्य एशियात भेटले. त्यांच्यात वैचारिक व आर्थिक देवाण-घेवाणही होत होती....

आपल्याला मदत करणाऱ्या माणसांशी नेहमी कृतज्ञ रहा.

या सुरवातीच्या काळात हे जे ग्रंथांचे भाषांतर झाले ते एवढे अचूक नसायचे. चिनी भाषा ही भारतीय पंडितांना एकदम नवीन व अनाकलनीय होती. त्यांचा बराच वेळ हा ती भाषा शिकण्यातच जायचा. भारतीय पंडित खऱ्या अर्थाने चिनी भाषा शिकले ते हुएन-त्संगच्या काळात. पण आपण चिनी भिक्षूंबद्दल नंतर पाहणार आहोत. त्यामुळे हा विषय येथेच सोडून देऊ.

या दोन महत्त्वाच्या महंतांबद्दल आपण वाचले पण एकदा राजाश्रय मिळाल्यावर भारतातून चीनमधे जाणाऱ्या बौद्ध महंतांची तुलनेने रीघच लागली. राजाने बांधून दिलेल्या श्वेताश्व मठात भाषांतराचे व धर्मप्रसाराचे काम मोठ्या नेटाने चालू झाले.

चिनी सम्राटांनी बौद्धधर्माला राजाश्रय दिल्यावर त्यांना भारतातून अजून धर्मगुरुंची गरज भासू लागली व त्यांनी अनेक धर्मगुरुंना चीनला येण्याचे आमंत्रण दिले. त्यांची नावे काही तिबेटच्या ग्रंथात आढळतात ती अशी- आर्यकाल, स्थाविरचिलू, काक्ष, श्रमण सउविनय. हे पहिल्या तुकडीत होते तर नंतर आलेल्यांची नावे होती, पंडित धर्मकाल व त्याच्या बरोबर गेलेले अनेक भिक्षू ज्यांची नावे आज आपल्याला माहीत नाहीत. पण काही जणांची चिनी इतिहासातून कळतात - महाबल, धर्मकाल, विघ्न, त्साऊ लुयेन, त्साऊ ता-ली व धर्मफळ. १७२-१८३ या काळात अजून एक पंडित आला. त्याचे नाव होते त्साऊ फा-सो. हे अर्थात त्याचे चिनी नाव आहे. त्याचे भारतीय नाव माहीत नाही. त्याने दोन ग्रंथांचे भाषांतर केले, पण ते ७३० साली नष्ट झाले असा चिनी इतिहासात उल्लेख आहे. महाबल यानेही त्याच मठात राहून एका ग्रंथाचे भाषांतर केले तो मात्र अजूनही चिनी त्रिपिटकामधे आहे. यात बोधिस्त्वाच्या कल्पनेबद्दल बरीच चर्चा केली आहे. त्यातच बुद्धाच्या आयुष्याबद्दल बरीच माहीती मिळते.

तिसऱ्या शतकात धर्मपाल चीनला गेला. जाताना त्याने त्याच्याबरोबर कपिलावस्तूमधून काही संस्कृत ग्रंथ नेले. यानेही त्याच मठात आश्रय घेऊन त्या ग्रंथाचे भाषांतर केले. त्यात त्याला मदत झाली एका तिबेटी श्रमणाची. हा तिबेटी असला तरी त्याचे वास्तव्य अनेक वर्षे मध्य भारतात होते. याचे नाव आहे खान मानसिआन. कदाचित खान हे त्या काळात आडनाव नसून पद होते हे लक्षात घेतल्यास ते खान मानसिंह असेही असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याने भाषांतर केलेल्या ग्रंथाचे नाव होते मध्यमासूत्र. हा दीर्घआगमामधील काही सूत्रे घेऊन रचला गेला.

या काळामधे हे सगळे पंडित त्यांच्या कामात सतत सुधारणा करीत धर्मप्रसार करीत होते. उदा. धर्मकाल जेव्हा चीनमधे आला तेव्हा त्याला उमगले की, चीनमधे विनयसूत्राबद्दल विशेष माहिती नाही. त्यात लिहिलेले नियम माहीत नसल्यामुळे बरेच प्रश्न उद्भवत होते. संघ नीट चालण्यासाठी अशा नियमांची आवश्यकता होती. प्रतिमोक्षसुत्रामधे हे सगळे नियम बुद्धानंतर सम्राट अशोकाने भरविलेल्या महापरिषदेने घालून दिलेले आपल्याला आढळतात. धर्मकालाने या नियमांचे भाषांतर करण्याचे काम प्रथम हाती घेतले व तडीस नेले. काळ होता इ.स. २५०. हाच चिनी भाषेतील ग्रंथ विनयपिटीका. दुर्दैवाने हाही ग्रंथ ७३० साली नष्ट झाला अशी नोंद आढळते.

अंदाजे २२४ साली अजून दोन पंडित भारतातून चीनमधे आले. एक होता विघ्न आणि दुसरा होता लु-येन. हे एकमेकांचे मित्र होते. या पंडितांनी बरोबर धर्मपादसूत्र आणले व त्याचे भाषांतर केले - थान-पोक-किन. त्यांनी हे काम सुरू केले तेव्हा त्यांना चिनी भाषेचा विशेष गंध नव्हता. पण त्याने डगमगून न जाता मोडक्यातोडक्या चिनी भाषेत त्यांनी हे काम नेटाने पुढे चालू ठेवले. पण त्यामुळे एक नुकसान झाले ते म्हणजे या भाषांतरात मूळ भाव उतरला नाही. हा ग्रंथ अजूनही चीनमधे काओ-सान-क्वान (प्रसिद्ध धर्मगुरुंच्या आठवणी) या ग्रंथात जपून ठेवलेला आहे. पंडित


(पृष्ठ क्र. १६ वर)

# आवरण : एक आत्मावलोकनाचा लोलक

*सुप्रसिद्ध कन्नड साहित्यिक भैरप्पा यांच्या एका कादंबरीचा ''आवरण'' या नावानी उमा कुलकर्णी यांनी अनुवाद केला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने हा अनुवाद प्रकाशित केला आहे. या कादंबरीवर प्रकाश टाकणारा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ चंद्रशेखर टिळक यांचा लेख – संपादक*

*हे मराठी पुस्तक अगदी आत्ताच वाचून पूर्ण झाले. कितव्यांदा हे पुस्तक मी वाचले हे मलाही आठवत नाही... गेल्या महिन्याभरात तिसऱ्यांदा एवढेच सांगू शकेन.*

आज आत्ता वाचून हे पुस्तक खाली ठेवत असताना सहजच मनात आले की, अभिनेत्री पल्लवी जोशीला कोणीतरी हे पुस्तक सुचवायला हवे.




काय सांगावे ?

तिचा नवरा, निर्माता – दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री या पुस्तकावर आधारित असा एक मस्त सिनेमा काढू शकेल. (त्यात किती आणि कितपत Cinematic Liberties घेता येतील ही बाब अलाहीदा!) कारण या पुस्तकावर आधारित सिनेमा काढायला धाडस पाहिजे. सराईत मसालेदार, व्यावसायिक सिने – निर्माता या भानगडीत पडणार नाही. पण ''दी ताश्कन्त फाईल्स'', ''दि काश्मीर फाईल्स'' सारखे सिनेमा काढणारा विवेक अग्निहोत्री 'कदाचित' हे धाडस करतील.

(असे म्हणताना 'कदाचित' हा मराठी भाषेतील सगळ्यात जास्त धोकादायक शब्द आहे याची मला पूर्ण जाणीव आहे.)

लोलक...

या पुस्तकावर सिनेमा काढावा असं मनात यायचे पहिले (तसे क्षुल्लक) कारण म्हणजे हे पुस्तक अगदी अचानक आणि एका अनाकलनीय वळणावर पूर्ण होते. सराईत हिंदी सिनेमा सारखे ! आणि हे वळण अगदी सलीम – जावेदच्या सिनेमासारखे आहे.

..तिथे कसं मदतीला येणारा माणूस नेहमी मुसलमानच असतो. हे पुस्तकही त्याच वळणावर पूर्ण होते. (सलीम – जावेदच्या कथेवर आधारित सिनेमात अमिताभ नाही का देवळात देवाला नावं ठेवतो आणि ७८६ चा बिल्ला त्याचे रक्षण करतो !!) पण हे वरवरचे झाले. ..आवरण

लोलक...

असा सिनेमा काढायचा झाला तर विवेक अग्निहोत्रीच का? कारण अशा तत्कालीन सामाजिक – राजकीय महत्त्वाच्या विषयांवर सिनेमे याआधी निघाले नाहीत असे नाहीत. अगदी काश्मीर हा विषय घेतला तरी लगेचच लक्षात येईल की, गुलजार साहेबांच्या 'माचिस' चा पोत वेगळा !

मणीरत्नमच्या 'रोझा' चा अरविंद स्वामी – मधू वेगळा ! आणि विवेक अग्निहोत्रीच्या 'दि काश्मीर फाईल्स' चा पोत आणि बाज वेगळा !

या पुस्तकात ती. भैरप्पा म्हणतात तसे...

तपशीलाची निवड, संदर्भ, विवेचन, चिंतन, अभिव्यक्तिची भाषा, शब्द प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र असते.

लोलक...

या पुस्तकावर आज सिनेमा निघावा (आणि तोही विवेक अग्निहोत्रीनी काढावा) असे वाटण्याचे कारण म्हणजे या पुस्तकात कथानकाच्या ओघात येणारा ग्यानवापी मशिदीचा संदर्भ. त्याखालच्या शिवमंदिराचा उल्लेख... सध्या हा विषय पुन्हा चर्चेत आहेच की !

त्यासाठी डोळे आणि डोके... कॅमेऱ्याचे डोळे...

या पुस्तकात ती. भैरप्पा म्हणतात तसे... इतिहासातील सत्य उघड्या डोळ्यांनी जाणून घेऊन स्वीकारल्याशिवाय इतिहासातून धडाही मिळत नाही.

लोलक ...

या पुस्तकात येणारी आणि आजही आपला वेगळा का होईना पण संदर्भ राखून असणारी अशी एक चर्चा... पाठ्यपुस्तकात आपल्याला पिढ्यानपिढ्या शिकवला जाणारा इतिहास... याबाबत या पुस्तकात येणारा सेमिनारचा सविस्तर संदर्भ ... अक्षरशः आणि शब्दशः मुळापासून वाचावा असा हा भाग आहे. ...

हा प्रसंग सिनेमात कसा येईल असा विचार माझ्या डोक्यात आला आणि क्षणार्धात 'दि ताश्कंद फाईल्स' सिनेमातील वादळी चर्चा आणि 'काश्मीर फाईल्स' मधली प्राध्यापिकेच्या भूमिकेतील पल्लवी जोशी डोळ्यांसमोर तरळू लागली. ...

या पुस्तकातली काही पाने वाचत असताना तर सध्या चर्चेत असलेले नुपूर शर्मा प्रकरण. ...

लोलक. ...

आणि या पुस्तकावर सिनेमा निघावा असे वाटण्याचं अजून एक कारण म्हणजे या पुस्तकात भैरप्पा / उमा कुलकर्णी म्हणतात तसे. ...

मानवी डोळ्यांपेक्षा कॅमेऱ्याचा डोळा हजार पटीने शक्तिवान असतो.

लोलक. ...

भैरप्पा, तुम्ही निव्वळ थोर आहात !

कित्येक वर्षांपूवी (निदान १५-१७ वर्षांपूवी) तुम्ही ही कादंबरी लिहिलित आणि आजही ते तंतोतंत. ... या पुस्तकावर आधारित सिनेमा असा विचार त्यावेळी माझ्या मनात आला खरा! पण असंही जाणवले की, हे पुस्तक म्हणजे एक आत्मावलोकनाचा लोलक आहे.

कादंबरी म्हटले तरी त्याचा आकार तसा छोटेखानीच आहे. पृष्ठसंख्या या निकषावर.

निदान भैरप्पा - उमाताई कुलकर्णी यांच्या पर्व कादंबरी इतकी ही कादंबरी निश्चितच जाडजूड नाही. लोलक कुठे जाडजूड असतो ? पण ही कादंबरी तुम्हांला एक वाचक म्हणून क्षणोक्षणी अंतर्मुख करत राहते. ...

लोलक. ...

यातले एक वाक्य तर मी माझ्या उभ्या आयुष्यात विसरणार नाही. ... पश्चात्ताप कृतीचा असतो की वृत्तीचा?

हा प्रश्न स्वतःला कादंबरीतले एक पात्र विचारत आहे. त्या पात्राच्या जवळच्या व्यक्तीसंबंधात हा प्रश्न त्या पात्राला त्या कादंबरीत पडला आहे.

लोलक. ...

याच कादंबरीच्या एका पुढच्या टप्प्यावर त्याच पात्राला त्याच जवळच्या व्यक्तिबाबत याच संदर्भात असाही प्रश्न पडला आहे की. ...

अशी चूक पुन्हा करणार नाही असा निर्धार असा पश्चाताप करण्यात नसतो का ?

लोलक. ...

या दोन वाक्यांची तीव्रता इतकी धारदार आहे की, एखादा वाचक त्याच्या/ तिच्या नकळत हे प्रश्न स्वतःला विचारायला लागतो.

माझं तरी झाले तसे. ...

आणि मग सहज मनात आले. ...

शास्त्रात सांगितलेला पश्चात्ताप - विधी एकदा करून पुरत असेलही. ... पण पश्चात्ताप हे म्हणजे सततच स्वतःला तापल्या तव्यावर उभे करणे आहे...

कारण पुन्हा अशी चूक करणार नाही अशी स्वतःसाठी घालून घ्यायची आचार - विचार संहिता ही पश्चात्ताप - विधिमागची धारणा आहे.

तसेच असले पाहिजे ना ?

असावीच लागते ना ?

पण असते का ?

लोलक. ...

या दोन - तीन आठवड्यात झालेल्या दोन घटनांनी. ... उदयपूरला झालेली हत्या आणि महाराष्ट्रात घडलेले सत्ता - नाट्य यांच्या पार्श्वभूमीवर तर या कादंबरीत उदमेखून / मुद्दामहून स्पष्टपणे न सांगितलेले आणि तरीही आपल्या मनात आपसूकपणे तरंग उठवत राहिलेले असे क्षण - कण - विचार. ...

(ही कादंबरी आणि या दोन घटना या तिन्ही गोष्टींना जोडणारा धागा म्हणजे डोळस आणि काल - सुसंगतपणे धर्माचा करावा लागणारा विचार!)

लोलक. ...

एखादी अशी गोष्ट वारंवार व्हायला लागली की आपली प्रतिक्रियाही बोथट व्हायला लागते का? अगदी कितीही आच लागत असली तरी? अगदी रडायला सुद्धा येत नाही ना ?

अशा परिस्थितीचे वर्णन या पुस्तकात अगदी यथार्थपणे येते. ...

रडू म्हणजे तापायला ठेवलेले दूध. ... दोनदा उतू जाते, त्यानंतर नुसतंच उकळत राहतं. पुन्हा उतू जात नाही.

लोलक. ...

त्यातून स्वतःशीच तरी बाहेर यायला लागले की आपले आपल्यालाच आश्चर्य वाटायला लागते की अशी कशी आपल्याला भूल पडली? आपण मग मनोमन मूळं शोधायला लागतो. आणि मग जाणवायला लागते. .. या पुस्तकात म्हटले आहे तसे. ..

भूल टाकणाऱ्या बोलण्याला मूळंच नसतात. ..

आपल्याला याबाबत अगदी आधीपासून कोणी ना कोणी सावध करू बघत असते. पण आपण लक्ष देत नाही.

आपण त्यावेळी प्रेमात असतो. .. स्वतःच्या तरी नाहीतर त्या कल्पनेच्या तरी !

आणि भैरप्पा या पुस्तकात म्हणतात तसं. .. प्रेमात पडलेल्या प्रेमिकाने उच्चारलेल्या एका वाक्यामध्ये हजारो संशोधकांनी मांडलेले संशोधन नाकारण्याची शक्ती असते !

लोलक. ..

आजही या कादंबरीविषयी लिहिण्याचे कारण म्हणजे या कादंबरीचं कथानक आणि सध्याची स्थिती यांत कमालीचे साम्य आहे. निदान समांतर आहे.

या कादंबरीतील उदाहरण देत हा मुद्दा पुढे न्यायचा असेल तर भैरप्पा यांनी लिहिलेले एक वाक्य सांगण्याचा मोह आवरत नाही. .. भैरप्पा लिहितात. ..

सार्वजनिक व्यक्तीच्या प्रत्येक खाजगी वागण्याला सार्वजनिक आयाम असतो. आपण कितीही म्हटलं की सार्वजनिक आणि खाजगी वेगवेगळं !

नाही होत ना तसे ?

लोलक. ..

आपण म्हणतो की काय त्यांचा संबंध?

भैरप्पा लिहून जातात. .. संपर्क नसला तरी धागे चिवट असतात.

लोलक. ..

साम्य आणि समांतर यांचा शब्दच्छल तरी

नाहीतर

निर्लज्ज निगरगट्टपणा. ..

हे नाही तर ते

दोन्हीकडे बनेल बुद्धिमान कारागिरी

पण आवरण. ..

लोलक. ..

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ती. भैरप्पानी लिहिलेले पहिलेच वाक्य आहे. ..

विस्मरणाने सत्य झाकोळून टाकणाऱ्या मायेला 'आवरण' म्हणतात. असत्य बिंबवणाऱ्या कार्याला 'विक्षेप' असे म्हटले जाते.

व्यक्तिगत पातळीवर चालणाऱ्या या क्रियेला 'अविद्या' म्हणतात आणि सामूहिक अथवा जागतिक पातळीवर चालणाऱ्या या क्रियेला 'माया' म्हणतात.

आज आपल्या आजूबाजूला यांपैकी नेमके काय सुरू आहे ?

लोलक. ..

आपण या ना त्या कारणाने हे आणि असे मुद्दे झाकत असतो. ..

कधी अनभिज्ञता

कधी अपरिहार्यता

कधी अगतिकता

कधी आगान्तुकता

अशाही अर्थाने आवरण

लोलक. ..

पण आवरण समोरून पाहणाऱ्यासाठी की स्वतःचे विचार दुसऱ्या पासून (अनेकदा तर स्वतःपासूनही) लपवण्यासाठी? ..

अशाही अर्थाने आवरण...

लोलक. ..

**– चन्द्रशेखर टिळक**
सी–४०२, राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ, राजाजी पथ,
डोंबिवली (पूर्व), पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

•••


***दिशा संपर्क दूरध्वनी***
**०२२-२५४२ ६२७०**


# स्थानिक इतिहासाचे दस्तऐवजीकरण

*कोणत्याही विषयांच्यासंदर्भात इतिहासाच्या दृष्टीकोनातून त्यांचे त्यांचे दस्तऐवजीकरण एकूणच त्या, त्या राष्ट्राच्या म्हणजेच पर्यायाने त्या, त्या समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यामुळे त्या विशिष्ट राष्ट्राचे महत्त्व हे आंतरराष्ट्रीय स्तरावरती सर्वांच्याच उपयोगी ठरते. – संपादक*

इंग्लंडमध्ये स्थानिक इतिहासाचं दस्तावेजीकरण करण्याबद्दल खूप आधीपासूनच खूप लक्ष पुरवलं गेलंय. इथं बहुतांश लोकांच्या स्वभावातच ही जपणूक करणं आहे. अगदी स्वतः नोंदी ठेवल्या नाहीत तरी त्या ठेवण्याबद्दल आणि ठेवणाऱ्यांबद्दल कुठेतरी आस्था तरी नक्की आहे. इंग्लंडमधल्या कुठल्याही छोट्या गावात गेलात तर तिथे एखादातरी असा स्थानिक इतिहासकार आणि इतिहासप्रेमींचा समूह नक्की असतो, जे ही कागदपत्रं आणि ह्या नोंदी ठेवत असतात. गावातल्याच एखाद्या चर्चमध्ये वगैरे महिन्या-दोन महिन्यांतून ही मंडळी ठरवून भेटतात. माहितीची देणाणघेवाण करतात. जुनी माहिती संकलित करून लोकांसमोर मांडतात. काही नवीन माहिती मिळाली असेल तर तीपण (ससंदर्भ!) लोकांसमोर मांडतात. त्यावर चर्चा करतात. वर्षभरात ह्या माहितीचा संकलन केलेला एखादा छापिल अंक प्रकाशित करतात. आणि हे काम अखंड सुरूच रहातं. एखाद्या लेखकाला किंवा इतिहासकाराला जर त्याच्या लिखाणाचा भाग म्हणून त्या विशिष्ट गावाबद्दल किंवा प्रभागाबद्दल विशिष्ट माहिती हवी असेल, तर ह्या स्थनिक इतिहासनोंदींतूनच मग ती मिळणं खूप सोपं जातं. इंग्लंडमधे वर्षोन्‌वर्षे अशी स्थानिक इतिहास जपण्याची परंपरा आहे.

लंडनमध्ये ज्या भागात मी रहातो तो भागही ह्याला अपवाद नाही. इथले Local History Society (स्थानिक



**WINTER PROGRAMME 2022-23**
Unless otherwise stated, our meetings are held at Christ Church, Redford Way, Uxbridge, at 7.30 p.m.

| | |
|---|---|
| **2022** | |
| September 20th | THE ORIGINS OF CHRIST CHURCH, UXBRIDGE<br>Ken Pearce |
| October 18th | PART-TIME SOLDIERS IN VICTORIAN UXBRIDGE<br>The Militias, Yeomanry and the Rifle Volunteers<br>Fr. Nicholas Schofield |
| November 15th | THE FESTIVAL OF BRITAIN<br>David Burnell |
| **2023** | |
| January 17th<br>**at 2.30 pm** | REBUILDING THE CITY AFTER THE GREAT FIRE<br>Jill Finch |
| February 21st | AN UNDERGROUND GUIDE TO 1950s LONDON<br>Nick Dobson |
| March 21st | ARCHAEOLOGICAL INVESTIGATIONS<br>AT CRANFORD PARK<br>Paul McGarrity |
| April 18th | Annual General Meeting followed by<br>REDFORD AND RICHES<br>The History of the Ancient Town and Borough of Uxbridge<br>Tony Mitchell |
| May | **DATE & DETAILS TO BE ADVISED** |

Please bring this card with you to meetings, and show it at the door.

Our Autumn meetings begin on 19th September, 2023.

कविता म्हणजे भावनांचं चित्र!

इतिहास मंडळ) १९४९ पासून कार्यरत आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी रात्री त्यांची मीटिंग जवळच्याच एका चर्चमधे असते. ३०-५० लोक सहज जमतात. बहुतकरून साठीपलीकडचे. मी एकटाच काय तो साठीअलीकडचा (आणि अश्वेतवर्णीय!). ह्या मंडळाचे चेअरमन आहेत केन पीअर्स नावाचे एक नव्वदीतले आजोबा. हे स्वतः ह्या भागातच जन्मले, शिकले, लग्न, नोकरीही इथेच केली, आणि आता निवृत्तीनंतर रहातातही ह्याच भागात. त्यामुळे त्यांना ह्या भागाची अगदी खडानखडा माहिती. पीअर्ससाहेब मंडळाचे चेअरमन बनले २२ ऑक्टोबर १९७० रोजी. आज ५२ वर्षांनंतरही तेच चेअरमन आहेत आणि दरमहाच्या सभांचे कार्याध्यक्षही. हे कमी की काय म्हणून मंडळाचं 'The Uxbridge Record' नावाचं एक त्रैमासिक निघतं. त्याचे संपादकही तेच आहेत. नुसते संपादक नाहीत तर दर त्रैमासिकात त्यांचा एकतरी लेख असतोच. (हे सगळे अंक ब्रिटिश लायब्ररीतही जपून ठेवलेले आहेत!)

आमच्या स्थानिक भागाविषयीची जवळपास १६ पुस्तकं आता माझ्या संग्रही आहेत. ह्या पुस्तकांमधे आमच्या स्थानिक भागाचा सुमारे १०,००० वर्षांपासूनचा इतिहास आलेला आहे. प्रागैतिहासिक - रोमन - ॅंग्लोसॅक्सन - नॉर्मन ते अगदी एकोणीस - वीस - एकविसाव्या शतकापर्यंत. जगाच्या किंवा इंग्लंडच्या दृष्टीने काही विशेष घटना किंवा व्यक्ती होऊन गेल्या आहेत का आमच्या भागात? तर ह्याचं उत्तर मी 'अजिबात नाही' असंच देईन. पण असं असलं तरी जे काही जुने कागद, चित्रं, हस्तलिखितं, फोटोज वगैरे उपलब्ध झालेले आहेत ते सगळे वापरून ही पुस्तकं लिहिली गेली आहेत. ही पुस्तकं वाचताना आणि त्यातले फोटो वगैरे पहाताना एक वेगळीच मजा असते. कारण बरेचदा पायी फेरफटका मारून हा आजूबाजूचा स्थानिक भाग पहाता येतो. पुस्तकात वाचलेली माहिती किंवा एखाद्या जुन्या फोटोतली जागा किंवा इमारत कधीतरी प्रत्यक्षात समोर असते. किंवा 'ह्या ठिकाणी आधी हे होतं' वगैरे लगेच मनात तरळून जातं. ही मजाच काही और आहे. ज्यांना ही कळते त्यांनाच मी काय म्हणतोय हे समजेल!

ह्यातली बहुतांश पुस्तकं स्वतः फोटो वगैरे काढून, पुराभिलेखागार वगैरे शोधून, पीअर्ससाहेबांनी लिहिलेली आहेत. काही पुस्तकं ४०-४५ वर्षं जुनी आहेत. त्यातली काही पुस्तकं आता अतिदुर्मीळ झालेली आहेत. पण मागचे काही महिने बरेच (नवे आणि सेकंडहँड!) बुकशॉप्स धुंडाळून मी ती सगळी पुस्तकं जमवली आणि शेवटी त्यांच्यावर पीअर्ससाहेबांच्या सह्या घेऊन मगच मला हायसं वाटलं!

आपल्याकडेही अनेक गावांना स्वतः चा इतिहास आहे. बरीच गावं अनेक ऐतिहासिक घटनांची साक्षीदार आहेत. कित्येक गावांना महान व्यक्तींचा सहवास लाभलेला आहे. आपण का बरं फक्त राजकारण आणि जातीपातींच्या दलदलीत अडकून एकमेकांवर फक्त चिखलफेकच करण्यात धन्यता मानतोय? - तीही अगदी स्थानिक पातळीपासून? हे सगळे हेवेदावे बाजूला ठेवून स्थानिक पातळीपासूनचा इतिहास जपायचं काहीतरी भरीव काम करायला सुरुवात आपण कधी करणार आहोत? जसजसा वेळ जातोय तसतशी आपली ही संसाधनं - जुने कागदपत्रं, जुन्या वास्तू, जुनीजाणती माणसं - हळूहळू नाहीशी होत जाणार आहेत. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षं होऊन गेलेली आहेत. कधी जागे होणार आहोत आपण?

इत्यलम्!

**- संकेत कुलकर्णी**

लंडन

●●●

# पद्मा गोळे : एका उजेडाचं स्मरण

*१२ फेब्रुवारी रोजी पद्माताई गोळे यांची पंचविसावी पुण्यतिथी होती. त्यानिमित्ताने त्यांनी लिहिलेल्या कवितांचा घेतलेला आढावा - संपादक*

आधुनिक शिक्षणासोबत आत्माविष्काराची लागलेली ओढ, राष्ट्रजीवनाबरोबरच व्यक्तिजीवनातही उमलते स्वातंत्र्य, स्वयंनिर्णयातून सापडलेलं आत्मभान अशा त्रिवेणीवर उभं असलेलं स्त्रीकवितेतील त्रिदल म्हणजे पद्मा गोळे, संजीवनी मराठे आणि इंदिरा संत !

पद्माताईंच्या कवितेतून तर आत्मप्रत्ययाच्याच ज्योती तेवताना दिसतात. ती जाळत नाही, उजळत जाते. ती अकारण तीव्र स्वर न लावता दृढतेने आपलं हृद्गत व्यक्त करते. अत्यंत निग्रही पण स्निग्ध.. संयत स्वरात स्त्रीभान व्यक्त करणाऱ्या कवितेत आरंभिक लक्षणीय कविता म्हणून पद्माताईंची कविता आस्वादता येते.



त्यांच्या कवितेत अनिष्टाचा विषाद असतो, पण विखार नसतो. परंपरेला प्रतिप्रश्न असतो, पण फारकत नसते. समानतेचा आक्रस्ताळा बाणा न दाखवता स्त्री-पुरुषांच्या युक्त आणि विभक्त जाणिवांचं भान त्या कवितेतून व्यक्त करतात. स्त्री म्हणून आत्मकरुणेचं रुदन नाही, की अन्याय! अन्याय! असं आक्रंदन नाही, अशी रडकी वा ओरडकी नसलेली पण अत्यंत आग्रही आणि संतुलित कविता पद्मा गोळे यांनी चाळीसच्या दशकापासून साधारण साठोत्तर दशकापर्यंत अशी दीर्घकाळ लिहिली.

एक शल्य आवर्जून नोंदवावंस वाटतं की मराठी समीक्षेने बाईंची म्हणावी तशी दखल घेतली नाही, बूज ठेवली नाही. त्यांच्या कवितेची चर्चा एका मर्यादेतच झाली. त्यांच्या कवितासंग्रहांच्या नव्या आवृत्त्या निघाल्या नाहीत. इतकी गुणशाली कविता असूनही समग्र कवितांचा प्रकल्प कुणी योजला नाही. एखाद्या विचक्षण अभ्यासकाच्या दृष्टीतून निवडक कवितांचा सभाष्य संग्रह काढावा असं कुणाला सुचलं नाही. १९४७ मध्ये प्रथम प्रकाशित झालेल्या 'प्रीतिपथावर' पासून 'नीहार, स्वप्नजा' आणि १९६८ मधला 'आकाशवेडी' या काव्यसंग्रहापैकी आज एकही संग्रह दुकानात उपलब्ध नाही हे आपल्याला निश्चितच भूषणावह नाही.

खरं तर साठोत्तरी कालखंड हा तोवर प्रकाशित साहित्याच्या पुनरावलोकनाचा आहे. अनेक पूर्वसुरी तथा समकालिनांचे साहित्य हे नवी समीक्षारूपे, नव्या भाष्यासह, कधी समग्र तर कधी निवडक, कधी जनआवृत्ती, तर कधी श्रेयस आवृत्ती अशा स्वरूपात आपण पाहिले आहे. किमान पुनर्मुद्रणं तरी होतातच. ते सारं वा यापैकी कोणतेही भाग्य पद्मा-काव्याला लाभलं नाही.

त्यांचा संयत स्वरच त्यांच्या उपेक्षेचं कारण झालं नसेल? मांडणीतील स्निग्धताच त्यांच्या पदरी कोरडी वंचना टाकत नसेल? कारण उपेक्षितांनी आपलं अंतरंग मूलबंधाला नाकारीत वा विद्रोही पुकार करीत उघड करण्यातूनच ते दखलपात्र होऊ शकतं अशी वहिवाट याच काळात गजबजून केली गेली. स्वातंत्र्य, आविष्कार

अशा जीवन वा लेखनमूल्यांना आक्रस्तळी शैलीच्याच वाहनाने त्या वाटेवर आवागमन करणं संभवनीय आहे अशी स्थिती साहित्यजगताने पाहिली आहे.

१२ फेब्रुवारी २०२३ पद्मा गोळे यांची पंचविसावी पुण्यतिथी होती. म्हणूनच आज त्यांचं कृतज्ञतापूर्वक स्मरण.

विशेषत्वाने आज त्यांच्या दोन कविता इथे पुनर्वाचनासाठी नोंदवतो आहे.

पहिली, एका आईची कविता आहे. आज मुलांनी पुढं कोणतं क्षेत्र निवडावं यासाठी पालक विशेष प्रयत्नशील असतात. विविध वाटांवरच्या खिडक्या ते उघडून दाखवत असतात. पण सर्वांनाच एक खिडकी विशेष प्रिय असते. त्याच खिडकीवर खूप गर्दी झालेली दिसते. ती खिडकी विदेशात उघडते. त्याच भूमीवरचं आकाश त्यांना खुणावत असतं. त्याचाच लळा मुलांनाही लागावा यासाठी पालकांची विशेष धडपडही असते. काही धडपड्या कवीमंडळींनी तसे 'पाळणे'ही लिहिल्याचे ऐकतो. पण पद्मा गोळे यांच्यामधली आई कोणत्या संकल्पाची रुजवण करते आहे ते पहा. ती कविता अवश्य वाचा.

बाळ, चाललासे रणा, घरा बांधिते तोरण,
पंचप्राणांच्या ज्योतींनी तुज करिते औक्षण.

याच विक्रमी बाहुंनी स्वतंत्रता राखायची,
खांदावरी या विसावे शांती उद्याच्या जगाची.

म्हणूनिया माझ्या डोळा नाही थेंबही दुःखाचा,
मीही महाराष्ट्र कन्या धर्म जाणते विरांचा...

नाही एकही हुंदका मुखावाटे काढणार,
मीच लावुनी ठेविली तुझ्या तलवारीस धार.

अशुभाची सावलीही नाही पडणार येथे
अरे, मीही सांगते हो जीजा, लक्ष्मीशीही नाते.

तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना, शक्ती देईल भवानी,
शिवरायांचे स्वरूप आठवावे रणांगणी.

धन्य करी माझी कूस, येई विजयी होऊन,
पुन्हा माझिया हाताने दूधभात भरवीन!

स्त्रीजन्म, परंपरेने चालत आलेली बंधनं, बद्धतेनं होणारी कुचंबणा आणि अशा साऱ्यासाठी शत्रुवत वाटणारी नियती.. त्याच नियतीविषयी पद्माताईंनी केलेला आत्मसंवाद 'आकाशवेडी' संग्रहातील पुढील कवितेतून प्रकट झाला आहे. त्यातून पसरणारा निर्वातातील दीपासारखा उजेड आजही हवाच आहे.

नियतीने करायला लावले ते मी निमूट केले
नियतीने 'करू नको' म्हटले तेही धृष्टपणे केले!
नियतीच्या डाव्या पायाची ठोकर खात
मी उजव्या पायाने तिला ठोकरून दिले..

आता समोरासमोर उभ्या आहोत दोघी
आधी कुणाचा हात येतो पुढे
हस्तांदोलनासाठी ते अजमावीत !

दोन कवितांतून दोन अभिव्यक्ती आपण पाहिल्या. दोन वाटा.. दोन्हीही वाटांवर पुढे सरण्याचा संकल्प. दोन्हीही कंटकाकीर्ण पण निराशेला स्थान नाही. त्यासाठी अडणं तर सोडाच, कण्हणंकुथणंही नाही. वज्रनिर्धाराने स्वतः चालणं.. चालवणं.. सारं काही उजेडाकडे नेणारं..

पंचविसाव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने पद्मा नावाच्या 'प्रकाशा'ला वंदन...

**– प्रमोद वसंत बापट**
०१, प्राजक्त, बी – ४, अशोकवन,
बोरिवली पूर्व, मुंबई : ४०००६६
भ्रमणध्वनी : ९८२१९७९८७१

•••

# सुरामेरय मज्जपमादठटाना वेरमणी सिक्खापदम् समादियामी।

*भगवान बुद्धाने दिलेल्या पंचशीलांपैकी 'सुरामेरय मज्जपमादठटाना वेरमणी सिक्खापदम् समादियामी' या शीलाबद्दल सदर लेखात दिलेली माहिती - संपादक*

भगवान बुद्धाने दिलेल्या पंचशीलांपैकी 'सुरामेरय मज्जपमादठटाना वेरमणी सिक्खापदम् समादियामी' हे एक शील आहे. याचा अर्थ असा आहे की, व्यक्तीने पक्की दारू (सुरा), कच्ची दारू (मेरय) किंवा मादक द्रव्यापासून (मज्जपमादठटाना) दूर राहावे, त्याचे सेवन करू नये. कुटुंब, समाज आणि देशाच्या एकूण विकासामध्ये आणि सुखांमध्ये या शीलाचे पालन केल्यास नक्कीच वाढ होईल. पण परिस्थिती आणि वस्तुस्थिती किती भिन्न आहे याचीही जाण आपणा सर्वांना आहेच. जगभरतले सगळेच धर्म त्यांच्या अनुयायांना दारू आणि मादक/अंमलीद्रव्यापासून दूर राहण्याचे आणि त्यांचे सेवन न करण्याचे प्रवचन देतात. हे प्रवचन धर्माची स्थापना झाल्यापासून अविरतपणे चालू आहे, म्हणजे किमान अडीच-तीन हजार वर्षांपासून तरी. पण त्याने समाजमनावर काही फरक पडला असे जाणवत नाही. कच्ची दारू प्यायल्यामुळे हजारो लोकांचे मृत्यू होतात, हे सर्वांना माहीतच आहे. दारू किंवा मादकद्रवे शरीरासाठी किती हानिकारक आहेत, यामुळे जर्जर आजार होतात याची माहिती शासन, प्रशासन, धर्मगुरू, डॉक्टर वारंवार देत असतात, पण म्हणून दारूच्या खपात आणि अमली पदार्थांच्या सेवनात कुठे कमी आली असे आपल्या वाचनात काही आले नसेल.

भारतामध्ये दारू उद्योग ५,४८२,८५१.३Bn एवढा आहे. दारू उद्योग भारतात खूप मोठा रोजगार आणि महसूल निर्माण करतो. कच्ची दारू (अवैध दारू) चा धंदा ही भारतात खूप मोठा आहे. दारू हा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विषय आहे. त्यामुळे दारूशी संबंधित एक निर्णय राजकारणात मोठी उलथापालथ निर्माण करतो, राज्याचे अर्थकारण हलवतो आणि सामाजिक वातावरण ढवळून काढतो. २०२० मध्ये जेव्हा राष्ट्रीय टाळेबंदी होती त्याही वेळी दारू उद्योग निराशेच्या गर्तेत नव्हता. १९४८ मध्ये संसदेने The Indian Power Alcohol Act, 1948 हा कायदा पारित करून दारू उद्योग केंद्र शासनाच्या आधीन राहून विकसित केला जावा अशी तरतूद करण्यात आली होती. भारतीय राज्यघटनेनुसार, सातव्या अनुसूचीमधील राज्य सूचीतील आयटम क्रमांक ५१ राज्याला दारूच्या व्यवसायावर नियंत्रण ठेवणारे नियम तयार करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाला सोपवतो. प्रत्येक राज्यास मद्यपानाशी संबंधित स्वतःचे कायदे करण्याचा अधिकार प्राप्त आहे. यामध्ये मद्य पिण्याचे कायदेशीर वय, अबकारी धोरण, परवाना प्रदान करण्याच्या अटी, मनाईचे नियम यांचा समावेश आहे. हेच कारण आहे की, वेगवेगळ्या राज्यामध्ये दारू पिण्यासाठी जे वय निर्धारित केले आहे ते वेगवेगळे आहे, अबकारी कर एकसमान नाही. काही राज्य ह्याच अधिकाराअंतर्गत त्यांच्या राज्यामध्ये दारूबंदी करू शकलेत. बिहार, गुजरात, त्रिपुरा, लक्षद्वीप, मिझोराम आणि नागालँड ही काही राज्ये आहेत ज्यांनी दारूबंदी केली आहे. संपूर्ण भारतामध्ये प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) स्वातंत्र्य दिन (१५ ऑगस्ट) गांधी जयंती आणि निवडणुकीच्या दिवशी 'ड्राय डे' पाळला जातो. याव्यतिरिक्त स्थानिक राज्ये

काही इतरही दिवशी 'ड्राय डे' असतात. ड्राय डे म्हणजे ज्या दिवशी दारूची दुकाने बंद ठेवली जातात. गंमत म्हणजे ड्राय डे पंचतारांकित हॉटेलांसाठी मात्र लागू होत नाही.

संपूर्ण राज्यामध्ये दारूबंदी व्हावी म्हणून सर्वोच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. ती जनहित याचिका नाकारताना, मुख्य न्यायाधीश श्री. लळीत म्हणाले की, ''या निव्वळ सामाजिक सुधारणांच्या बाबी नाहीत. त्यांच्याशी अविभाज्यपणे जोडलेला महसूलाचा मुद्दा आहे. अनेक राज्ये महसुलावर अवलंबून आहेत. जर आपण काही करण्याचा प्रयत्न केला तर उत्पन्नाच्या स्रोतांचे काय होईल? आणि त्या कमाईचा उपयोग सामाजिक उन्नतीसाठी केला जाऊ शकतो.''

बरं, ज्या राज्यात दारूबंदी आहे, काय खरंच तिथे दारू मिळत नाही का? बुद्धाने सांगितलेल्या शीलाप्रमाणे व्यक्तीस पक्की दारू आणि कच्ची दारू दोहोंपासून दूर राहायचे आहे, कशाचेही सेवन करायचे नाही. हा फक्त नैतिकतेचाच भाग आहे असा नाही; तर स्वतःचे व समाजाचे आरोग्य चांगले राखण्याचा देखील भाग आहे. पक्की दारू (इथे कायद्याद्वारे विकल्या जाणारी, या अर्थाने) शासनाच्या महसुलाचा मुख्य स्रोत आहे. परंतु कच्ची दारू (अवैध या अर्थाने) दारूबंदी असलेल्या राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात विक्री आणि सेवन केली जाते. अवैध दारूने शासन फक्त महसूलच गमावतात असे नाही, तर कायदा आणि सुव्यवस्थेच्या मोठ्या समस्येला तोंड देत असतात. भारतामध्ये ज्या ज्या राज्यात दारूबंदी आहे त्या ठिकाणी अवैध दारू मोठ्या प्रमाणात विकली जाते, यातून कोण नफा कमावतो हा तर वेगळाच विषय आहे. पण अशा अवैध दारूचे सेवन केल्याने हजारो लोक मृत्युमुखी पडत असतात. गुजरात आणि बिहारच्या अशा अनेक बातम्या आपण वाचल्या असतीलच. वर्ल्ड हेल्थ ऑर्गोनायझेशनच्या अहवालाप्रमाणे भारतात प्रत्येक वर्षी २.६ लाख लोक दारूच्या सेवनाने किंवा त्यामुळे उद्भवणाऱ्या आजाराने मरतात. रस्त्यावर होणाऱ्या एकूण अपघातांमध्ये दारू पिऊन गाडी चालविल्यामुळे होत असलेल्या अपघातांचे प्रमाण खूप मोठे आहे. NCRB च्या २०२१ च्या अहवालानुसार महिलांविरोधात होणाऱ्या अपराधांमध्ये ८५% प्रभाव हा दारूचा असतो. यामध्ये घरात होणारा हिंसाचार आणि घराबाहेर होणाऱ्या अपराधाचा समावेश आहे.

भगवान बुद्धाने दिलेल्या या शीलामध्ये तिसऱ्या एका बाबीचा समावेश आहे आणि ती म्हणजे मादक द्रव्यापासून दूर राहणे, मादक द्रव्ये म्हणजे अमलीपदार्थ. भारतामध्ये अंमलीपदार्थाची तस्करी, त्याची विक्री आणि सेवन ही काही लपलेली बाब नाही. पंजाब राज्य कशाप्रकारे अंमलीपदार्थ युक्त राज्य झाले होते, हे आपणास माहितीच असेल. अंमली औषधद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ या कायद्याची स्थापना करून देशाला अंमली द्रव्य मुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला होता; पण तो पूर्णपणे सफल झाला असे आतातरी म्हणता येत नाही. या कायद्याने तपास यंत्रणेला खूप अधिकार दिले आहेत, त्या माध्यमातून त्यांनी देशाला या नशेतून मुक्त करणे अभिप्रेत आहे. अनेक तरुण-तरुणी अंमलीपदार्थाच्या सेवनाने आयुष्य बरबाद करून घेतात. भारतात भांग, अफू आणि हेरॉईन ही प्रमुख अंमली औषधे वापरली जातात. तसेच बुप्रेनॉर्फिन, प्रोपॉक्सीफेन आणि हेरॉइन ही सर्वात जास्त इंजेक्शनच्या माध्यमातून सेवन होणारी अंमली द्रव्ये आहे. नुकतेच गुजरातच्या एका पोर्टवर खूप मोठ्या प्रमाणात अंमली द्रव्ये पकडण्यात आली होती,

त्याच्यासंबंधी विशेष चर्चा माध्यमांनी केली नाही. परंतु असे अंमली पदार्थ भारतात येणे हे आपल्यासाठी चांगली बाब नाही. रिया चक्रवर्ती आणि शाहरुखचा मुलगा आर्यन खानच्या प्रकरणानंतर अंमली पदार्थाच्या सेवनावर माध्यमामध्ये खूप चर्चा झाली, परंतु ती अवास्तव आणि मनोरंजनात्मकच जास्त होती. माध्यमांनी टीआरपीच्या भानगडीत पडण्यापेक्षा यावर सकारात्मक चर्चा घडवून आणणे महत्त्वाचे आहे.

दारूवर १००% बंदी, महसूल नुकसानाव्यतिरिक्त समाजामध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण करेल ही भीती असेल तर, शासनांनी किमान आहे ते नियम तरी व्यवस्थित आणि कठोरतेने राबविले पाहिजेत. महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ अंतर्गत महाराष्ट्रात दारूबंदीचे धोरण राबविता येते. या कायद्याअंतर्गत महाराष्ट्र शासनाने अनेक वेळा वेगवेगळ्या ठिकाणी दारूबंदी केली आहे. लोकांनी दारूचे व्यसन सोडावे म्हणून शासन अनेक जाहिराती करते. शासनाने प्रत्येक महाविद्यालयात वेळावेळी तरुण-तरुणींना मार्गदर्शन आणि गरज असेल तर समुपदेशन करणे आवश्यक आहे. अंमली पदार्थाच्या व्यसनी लोकांपेक्षा तस्करी करणाऱ्यांवर आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे. शासन-प्रशासन आपले काम करेलच, पण नागरिकांनाही याबाबत सचेत आणि सावध राहणे आवश्यक आहे. दारू आणि अंमली पदार्थ सेवन करू नये हे शील पाळावे किंवा कायद्याच्या नियमाप्रमाणे, प्रतिबंधित नसलेले मद्य, नियमाप्रमाणे सेवन करावे असा (नको असलेला) मध्य मार्ग वापरावा, एवढाच काय तो सल्ला इथे देता येऊ शकतो.

**– प्रा. विनोद एच वाघ**
विद्या प्रसारक मंडळाचे टीएमसी विधी
महाविद्यालय, ठाणे

●●●

(पृष्ठ क्र. ५ वरून – **भारतातून चीनला गेलेले बौद्धधर्मप्रसारक – भाग २**)

विघ्नाच्या मृत्युनंतरही लु-येन याने हे काम चालू ठेवले व आणखी तीन ग्रंथांचे भाषांतर केले, ज्यात बुद्धाने जी सूत्रे सांगितली ती लिहिली आहेत.

वर उल्लेख केलेला खान सान नी हा मूळचा तिबेटी पण भारतात स्थायीक झाला होता. तिबेटच्या पंतप्रधानाचा (खान्-कू) हा मुलगा. २४१ साली याने चीनचा रस्ता धरला व तो त्यावेळची राजधानी नानकिंग येथे पोहोचला. त्यावेळी तेथे वू घराण्याचे राज्य होते. सम्राट सन खुएनची या धर्मगुरुवर विशेष मर्जी बसली. त्याने त्यास नवीन मठ बांधण्याचा आदेश दिला. त्याने तो लगेच आमलात आणून त्या मठाला नाव दिले 'किएन-कू मठ'. ज्या गावात हा मठ बांधला गेला त्या गावाचेही नाव ठेवण्यात आले 'बुद्धग्राम'. याचे उद्घाटन खुद्द सम्राटांच्या हस्ते करण्यात आले. याही महंताने एकूण १४ ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर केले. त्यातील एक महत्त्वाचा होता शत परमिता सन्निपातसुत्र. हा म्हणजे आपल्या 'जातक कथा' आहेत. दुसरा ग्रंथ होता संयुक्तावादनसूत्र. हा एक महायान पंथाचा ग्रंथ आहे. काळ होता २५१.

एक लक्षात येते की, भारतातील धर्मगुरु हे सरळ चीनला अफगाणिस्थानमार्गे जात नसत. ते अगोदर मध्य एशियात जात व तेथून रेशीममार्गाने एखाद्या व्यापारी तांड्याबरोबर चीनला जात.

याखेरीज अजूनही काही धर्मप्रसारक भारतातून चीनला गेले. त्यांची नावे -

कल्याणरुण, कल्याण, आणि गोरक्ष.


**– जयंत कुलकर्णी**
ज्येष्ठ अभ्यासक पुणे

●●●

# 'जन ठायीं ठायीं तुंबला'

*विनय हर्डीकर लिखित 'जन ठायीं ठायीं तुंबला' या पुस्तकाच्या निमित्ताने ज्येष्ठ पत्रकार, संपादक, लेखक विनय हर्डीकर यांच्या राजकीय-सामाजिक लेखांचा संग्रह 'जन ठायीं ठायीं तुंबला' या नावाने नुकताच प्रसिद्ध झाला आहे. जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद यांनी हा संग्रह प्रकाशित केला आहे. या संग्रहाचे संपादन राम जगताप यांनी केले आहे. या संग्रहाला लिहिलेल्या दीर्घ प्रस्तावनेचा हा संपादित अंश. - संपादक*

पत्रकार, समीक्षक, शास्त्रीय संगीताचे जाणकार, मर्ढेकर-शेक्स्पिअर यांचे अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते, गिर्यारोहक आणि वक्ते अशा विविध कॅलिडोस्कोपिक रूपांत लीलया वावरणारे विनय हर्डीकर हे काहीसे कलंदर व्यक्तिमत्त्व आहे. काही माणसे विनाकारण स्वतःविषयी गैरसमज निर्माण करून ठेवतात; तर काही माणसांबद्दल इतर लोक गैरसमज निर्माण करून घेतात. हर्डीकर या दोन्ही प्रवादांचे धनी आहेत आणि याची त्यांना स्वतःलाही चांगली जाणीव आहे, पण तरीही 'आपण बुवा असे आहोत आणि असेच राहू' हा त्यांचा बाणा आहे. त्यामुळे हर्डीकर अनेकांना हेकेखोर वाटतात. मात्र, तरीही मूळचा सामाजिक कार्यकर्त्याचा पिंड, पत्रकाराची शोधक दृष्टी, चौफेर भ्रमंती आणि जोडीला अनेकविध विषयांचा व्यासंग-अभ्यास आणि प्रत्येक विषयावरची स्वतःची खास ठाम आणि परखड मते, यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अनेकांना भुरळ पडते. काव्य, चित्रपट, संगीत, खेळ, शेती, सामाजिक चळवळी, राष्ट्रीय राजकारण, कुठलाही विषय काढा त्यात हर्डीकरांचा व्यासंग असतोच असतो. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा आणि त्यांच्या व्यासंगाचा आवाका आता आकळू लागला आहे, असे वाटू लागते न लागते तोच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा नवा पैलू समोर येतो, त्यांच्या व्यासंगाचा नवा विषय समजतो आणि विस्मयचकित व्हायला होते!




हर्डीकरांशी मैत्री असणे हा बौद्धिकदृष्ट्या फार आनंदाचा भाग असला तरी ही गोष्ट सहज परवडणारी नसते. त्यांच्या वागण्या-बोलण्याला एक तीक्ष्ण आणि तिखट धार असते. 'अघळपघळपणा' वा 'शिळोप्याच्या गप्पा' या गोष्टी त्यांचा शब्दकोशात नाहीत. शिवाय त्यांचे प्रसंगावधान इतके जबरदस्त आहे की, तुम्ही चुकून एखादा उणा-वावगा शब्द बोललात, तरी ते तुमचा खिमा करून टाकतात! चुकलेल्या कुणाचीही ते गय करत नाहीत, अगदी स्वतःचीही. त्यामुळे त्यांचा तिखटपणा साहवतो. कारण त्यात हिशेबीपणा नसतो; आपपरभाव नसतो. 'सत्याला सत्य म्हणून जाणा आणि असत्याला असत्य म्हणून जाणा' या गौतम बुद्धाच्या वचनाचा प्रत्यय ते आपल्या वाणी व लेखणीतून सतत करून देतात. म्हणून स्वतःच्या 'टर्म्स अँड कंडिशन्स'वर जगणारा हा माणूस काहीसा फाटक्या तोंडाचा असला, तरी तितकाच लोभसही आहे! त्यांचा मित्र-स्नेही परिवार अफाट आणि तोही विविध

क्षेत्रांमधला आहे. कारण समोरच्या व्यक्तीला आपलेसे करून घेण्याची, खिशात टाकण्याची त्यांची एक तऱ्हेवाईक, पण आत्मीय ट्रिक आहे. तिचा ते खुबीने वापर करतात. एकदा जोडलेला माणूस सहसा तोडला जाऊ नये, याची तापट स्वभाव असूनही ते तितकीच काळजीही घेतात! काही माणसांना फार चांगल्या प्रकारे विचार करता येतो, तो इतरांना तितक्याच चांगल्या प्रकारे सांगताही येतो; पण तो विचार आणि प्रत्यक्षातला व्यवहार यातील विसंगती मात्र त्यांना फारशी कमी करता येत नाही. अनेकदा ते त्यांच्या लक्षातही येत नाही. हर्डीकरांच्या विचार आणि व्यवहारात मात्र कमालीचे साधर्म्य आहे!

माणूस म्हणून विनय हर्डीकर काहीसे तऱ्हेवाईक असले, तरी लेखक म्हणून मात्र अतिशय समतोल, तारतम्यपूर्ण आणि समंजस आहेत. त्यांचे बोलणे आणि लिहिणे यात कमालीचे साम्य आहे. त्यामुळे एकदा कागदावर उतरलेला मजकूर हाच त्यांचा अंतिम खर्डा असतो. त्यात काही बदल करण्याची गरज त्यांना पडत नाही. लेखनाबाबतची त्यांची ही शिस्तबद्धता आणि काटेकोरपणा या दोन्ही गोष्टी वाखाणण्याजोग्या आहेत. त्यामुळे गेल्या सदतीस वर्षांमध्ये त्यांच्या नावावर अवघी पाच पुस्तके आहेत. वयाच्या २९व्या वर्षी लिहिलेले 'जनांचा प्रवाहो चालिला' हे त्यांचे पहिलेच पुस्तक बरेच गाजले होते. आणीबाणीच्या विरोधात लिहिलेल्या या पुस्तकाला १९८१मध्ये महाराष्ट्र सरकारने आधी पुरस्कार जाहीर करून नंतर तो नाकारला होता. साहित्य-समाज क्षेत्रातील मान्यवरांविषयीच्या लेखांचे 'श्रद्धांजली' (१९९७), बा. सी. मर्ढेकरांच्या कवितांची चरित्रात्मक अंगाने समीक्षा करणारे 'कारुण्योपनिषद' (१९९९), राजकीय-सामाजिक लेखांचे 'विठोबाची आंगी' (२००५) आणि गतवर्षी प्रकाशित झालेले व 'श्रद्धांजली'चा पुढचा भाग म्हणता येईल अशा मान्यवरांवरील लेखांचे 'देवाचे लाडके' (२०१५), ही त्यांची इतर पुस्तकेही तितकीच तोलामोलाची आणि महत्त्वाची आहेत. प्रस्तुत पुस्तक धरले, तर गेल्या अडतीस वर्षांत हर्डीकरांच्या नावावर सहा पुस्तके जमा होतात. म्हणजे साधारणपणे सहा वर्षाला एक पुस्तक अशी त्यांच्या लेखनाची सरासरी निघते. वर्षाला एखाद-दुसराच लेख लिहिणाऱ्या हर्डीकरांचा लेखनवेग पाहता, ते साहजिकही म्हणावे लागेल. १९७८ ते १९९७ या पहिल्या १९ वर्षांत एकच पुस्तक म्हणजे साठीनंतर त्यांचा लेखनवेग किंचित वाढला आहे.

'माझं लेखन हे फर्स्ट पर्सन डॉक्युमेंटरी आहे' असे हर्डीकर स्वतःच्या लेखनाविषयी म्हणतात. कारण स्वतःचे अनुभवसिद्ध विश्व आणि वाचन हा त्यांच्या लेखनाचा गाभा असतो. हर्डीकरांचे अनुभवविश्वही खूपच विस्तृत आणि वैविध्यपूर्ण आहे. साहित्य (मराठी-हिंदी-इंग्रजी), राजकारण, समाजकारण, सामाजिक चळवळी-आंदोलने, शास्त्रीय संगीत अशा क्षेत्रांत त्यांना कमालीचा रस आहे आणि या क्षेत्रांची त्यांना उत्तम जाणही आहे.

ज्ञानप्रबोधिनी, न्यू क्रेस्ट, इंडियन एक्स्प्रेस, ग्रामायण, शेतकरी संघटना, देशमुख आणि कंपनी, रानडे इन्स्टिट्यूट (पुणे विद्यापीठ) आणि फ्लेम हे पुण्यातील खासगी विद्यापीठ असा विनय हर्डीकरांचा वैविध्यपूर्ण प्रवास आहे. या प्रत्येक ठिकाणी ते स्वतःहून गेले आणि मनासारखे काम करता येत नाही हे लक्षात आल्यावर देशमुख आणि कंपनी वगळता त्या-त्या ठिकाणांहून स्वतःहून बाहेर पडले.

हिंदीतील मान्यवर कवी (कै.) गजानन माधव मुक्तिबोध त्यांना भेटायला येणाऱ्या प्रत्येकाला, विशेषतः तरुण साहित्यिकांना, 'पार्टनर, तुम्हारी पॉलिटिक्स क्या है?' असा प्रश्न विचारत. तो काळ होता साठीचा. त्यानंतर नव्वदोत्तरी काळ आला आणि तोही संपला.

सध्या निष्क्रियोत्तरी काळ सुरू झालेला आहे. गेल्या पाच दशकांहून अधिकच्या काळात हिंदीमध्ये मुक्तिबोधांच्या या वाक्याला 'मोस्ट कोटेबल कोट'चे स्वरूप आले आहे. कुणाच्याही भूमिकेविषयी प्रश्न उपस्थित करायचा झाल्यास, कुणाच्याही भूमिकेची चिकित्सा करायची झाल्यास या विधानाचा संदर्भ दिला जातो. मग ते राजकारणी असोत वा सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक असोत वा पत्रकार असोत. मुक्तिबोध यांचा हा प्रश्न सूचक आहे आणि तितकाच मर्मभेदक-खोचकही आहे. कारण 'राजकारण' या शब्दाविषयी आपल्याकडे भयानक आणि भयंकर असे समज-गैरसमज आहेत. हा शब्द भारतीयांनी इतका बदनाम करून ठेवला आहे की, तो आता जवळपास तुच्छतेनेच वापरला जातो. अर्थात, इथे 'राजकारण' या शब्दाचा इतिहास, वर्तमान किंवा त्याची व्युत्पत्ती आणि मूलार्थ हा प्रतिपाद्य विषय नाही. त्यामुळे ती चर्चा इथेच थांबवू आणि मुक्तिबोध 'पॉलिटिक्स' हा शब्द कोणत्या अर्थाने वापरतात ते समजून घेऊ. ते 'रोल' वा 'भूमिका' या अर्थाने हा शब्द वापरतात. म्हणजे, 'पार्टनर, तुम्हारी पॉलिटिक्स क्या है?' याचा अर्थ, 'मित्रा, तुझी नेमकी (राजकीय) भूमिका काय आहे?'

मात्र, बहुतेकांनी (त्यात पत्रकार-लेखक-संपादक-प्राध्यापक-वकील-डॉक्टर-सामाजिक कार्यकर्ते असे सर्व आले) याचा कधी विचारच केलेला नसतो. स्वत:ला सतत प्रश्न विचारण्याची आणि स्वत:ची सतत समीक्षा करण्याची 'सवय' अनेकांना नसते, ती त्यांच्या अंगवळणी पडलेली नसते. अशी 'सवय' लावून घेतली पाहिजे, याचाही त्यांनी कधी विचार केलेला नसतो. त्यामुळे वरील प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळेलच याची पुरेशी खात्री नसते. कारण विचार आणि व्यवहार यातली तफावत कमीत कमी ठेवण्यासाठी धडपडणारे लोकही कमीच असतात...

पण 'पॉलिटिक्स' म्हणजे नेमके काय? जॉर्ज ऑर्वेल हा ब्रिटिश लेखक म्हणतो, 'राजकारण हा शब्द शक्य तितक्या उदारपणे घ्यावा. जगाला एका विशिष्ट हेतूने ढकलणे, हाही राजकीय हेतूचा/धोरणाचाच भाग असतो.' हर्डीकर त्यांचे आजवरचे सामाजिक काम आणि लेखन याच धारणेतून करत आले आहेत. आता हर्डीकर सत्तरीच्या आसपास आहेत. वयाच्या २२व्या वर्षापासून ते कुठल्या ना कुठल्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक चळवळीशी संबंधित आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, ज्ञानप्रबोधिनी, जनता पक्ष आणि शेतकरी संघटना या संस्थांमध्ये त्यांनी काही काळ पूर्णवेळ काम केले; पण ते करत असतानाच युवक क्रांती दल, राष्ट्र सेवा दल या संघटनांच्याही ते संपर्कात होते. म्हणजे पूर्णवेळ व अर्धवेळ कार्यकर्ता म्हणून काम करणे, तर कधी त्या संस्था वा चळवळीचा अजेंडा ठरवण्याचे वा नवी दिशा शोधण्याचे काम हर्डीकरांनी केले आहे. संघ, ज्ञानप्रबोधिनी, जनता पक्ष, माणूस साप्ताहिक, साधना साप्ताहिक, ग्रामायण, न्यू क्वेस्ट, शेतकरी संघटना, स्वतंत्र भारत पक्ष अशा वेगवेगळ्या संस्था-संघटना-चळवळींमध्ये हर्डीकरांनी काम केले. पहिली दोनेक वर्षे ते त्या संस्थेची कार्यपद्धती समजून घेऊन त्यानुसार काम करतात. त्यानंतर त्या संस्थेची उद्दिष्टे, त्याचे परिणाम आणि संस्थेचे अंतिम ध्येय यांचा विचार करून काही प्रश्न उपस्थित करतात, व्यापक विचार करून काय हितावह आहे वा नाही याविषयी सांगायला लागतात. लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, मूल्ये, नीतिमत्ता, कुटुंबव्यवस्था, राजकारण यांचा विचार करून आपली भूमिका मांडतात. विचारांती स्वीकारलेल्या निष्कर्षांवर ठाम राहतात. केवळ चर्चेच्या पातळीवरच नाही तर दैनंदिन संवादाच्या, प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवरील मतभेद गृहीत धरून किमान समान कार्यक्रम कसा ठरवून राबवता येईल यावर भर देतात. सतत स्वत:ची आणि इतरांची समीक्षा करत राहणे, यातून

अंतिमत: फायदाच होतो हे मानणारे, योग्य मुद्यांवर केला जाणारा विरोध हा आपला बाणा अधिक धारदार करतो, हे जाणून असलेले हर्डीकर खरे म्हणजे 'पूर्णतेच्या शोधातले पांथस्थ' आहेत. गेल्या ४०-४५ वर्षांच्या काळात त्यांनी ज्या ज्या संस्था-संघटना-चळवळींसोबत काम केले, त्यातील कोणत्याच संस्थेने दीर्घकाळ हर्डीकरांच्या अपेक्षित मार्गावरून वाटचाल केलेली नाही. काहींचे प्रवास तर नंतर नंतर भरकटत गेले. परिणामी हर्डीकरही त्यांच्यासोबत फार काळ राहिले नाहीत.

आपला अजेंडा कुठलीच संस्था-संघटना पूर्णपणे स्वीकारत नाही, याचा इतक्या वर्षांच्या काळात वारंवार अनुभव येऊनही हर्डीकर अजूनही निराश झालेले नाहीत. यापुढे कुठलीच संस्था-संघटना तो स्वीकारणार नाही, यावरचा त्यांचा विश्वासही कमी झालेला नाही आणि काहीतरी करून दाखवण्याची ऊर्मीही निमालेली नाही. कीर्ती आणि मानमान्यता यासाठी प्रसिद्ध संस्कृत नाटककार भवभूतीला त्याच्या आयुष्यात बरेच झगडावे लागले. पण निराश न होता त्याने 'माझ्या प्रतिभेला न्याय देणारा सहृदय आत्मा कधी तरी, कोठे तरी भेटेलच; काळ अनंत आहे आणि पृथ्वी विपुल आहे,' असे उद्‌गार काढल्याचे सांगितले जाते. हर्डीकरांचा आशावादही तितकाच दुर्दम्य आणि बुलंद आहे. शिवाय आजही त्यांच्यातील बंडखोरपणाही तितकाच ज्वलंत आहे. बंडखोरी ही कुठल्याही व्यक्तीच्या मनाची, बुद्धीची युवावस्था असते. हर्डीकरांनी त्यांच्या 'देवाचे लाडके' या पुस्तकातील एका लेखात (पृ. १६८) 'साधना' साप्ताहिकाचे माजी संपादक यदुनाथ थत्ते यांनी सांगितलेली 'युवक' या शब्दाची सहा लक्षणे उद्धृत केली आहेत. ती अशी - ''युवक साहसाच्या मार्गानं जातात, सुरक्षिततेच्या नाही. आपल्या आधीच्या पिढ्यांचं ढोंग ते उघडकीला आणतात. परिवर्तनाला विरोध करणारी (जुनाट) विचारसरणी युवक नाकारतो. युवकाला आयुष्यासाठी एक उदात्त हेतू हवा असतो. त्याला मुक्कामापेक्षा प्रवास महत्त्वाचा वाटतो. वैफल्याची चैन त्यांना परवडत नाही.'' ही सहाच्या सहाही लक्षणे हर्डीकर यांना आजही जशीच्या तशी लागू पडतात.

हर्डीकर यांच्यासारखी माणसे राजकारणात असोत किंवा समाजकारणात, अध्यापनात असोत की पत्रकारितेत, ती असतील तिथे 'करेक्टिव्ह फॅक्टर' म्हणून काम करतात. जर-तरला एका मर्यादेनंतर काही अर्थ नसतो, पण हर्डीकर सक्रिय राजकारणात सहभागी झाले असते, तर त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर, ते ज्या सभागृहात गेले असते, तिथल्या चर्चांची पातळी नक्की उंचावली असती, निदान खाली आली नसती. पण भारतीय लोकशाही राजकारणाचा विशेषत: आणीबाणीनंतर जो झपाट्याने अध:पात होत आला आहे, त्यात एकट्या-दुकट्याच्या तत्त्वनिष्ठ राजकारणाचा फारसा पाडाव लागणे शक्य नाही. शिवाय आणीबाणीसारखे पक्षीय नेत्यांचे राजकारण टोकाला गेल्याशिवाय भारतीय जनता खडबडून जागी होत नाही. त्यामुळे भारतीय राजकारणात जनता पक्षाच्या प्रयोगानंतर काँग्रेस-भाजपव्यतिरिक्त तिसऱ्या आघाडीचे राजकारण यशस्वी होताना दिसत नाही. शिवाय हर्डीकर सुरुवातीपासून काँग्रेसी पद्धतीच्या राजकारणाचे विरोधक राहिले आहेत. भाजपविषयी त्यांना सहानुभूती आहे, पण त्या पक्षासोबत त्यांना जायचे नाही. शिवाय हर्डीकरांच्याच सिद्धान्तानुसार भाजपलाही स्वत:चे काँग्रेसीकरण केल्याशिवाय सत्ता मिळवता येत नाही. त्यामुळे हर्डीकर भाजपमध्ये गेले असते तरी ते तिथे फार काळ राहू शकले नसते. हर्डीकरांचा निर्भीड बाणा, आचार-विचारातील समानता आणि व्यापक समाजहित पाहता ते गेली ४०-४५ वर्षे म्हटले तर प्रचलित राजकारणाला समांतर, म्हटले तर एक दबाव गट म्हणून काम करणाऱ्या संस्था-संघटना, चळवळींचे फ्रेंड-

फिलॉसॉफर-गाइड म्हणून काम करत राहिले. तोच त्यांचा स्वभाव आहे, तेच त्यांचे राजकारण आहे. अनेक संस्था-संघटना-चळवळी, त्यांचे नेते यांच्यासोबत हर्डीकरांनी काम केले. आप्पा पेंडसे, बाबा आमटे, शरद जोशी, शंकर नियोगी यांचा त्यांच्यावर त्या-त्या काळात प्रभावही पडला. पण यापैकी कुणाच्याही आहारी हर्डीकर गेले नाहीत. आणीबाणीनंतर त्यांनी काही काळ जनता पक्षासाठी काम केले. शेतकरी संघटनेच्या स्वतंत्र भारत पक्षासाठीही काम केले. दोन्ही ठिकाणचा त्यांचा अनुभव फारसा समाधानकारक नसला तरी लोकशाहीतील संसदीय राजकारणाचा त्यांना तिटकारा आलेला नाही. उलट सक्रिय राजकारणात जाऊन आपल्या परीने काहीतरी ठोस काम करण्याची त्यांची भावना तितकीच प्रबळ आहे. शिवाय आजवरच्या सबंध प्रवासात त्यांनी कुणालाही स्वत:ला गृहीत धरू दिले नाही आणि एका मर्यादेनंतर कुठलीही गोष्ट गृहीत धरली नाही. अशी भूमिका असलेली व्यक्ती राजकारणात असली काय, समाजकारणात असली काय, अध्यापनाच्या क्षेत्रात असली काय, तिचा प्रभाव सारखाच असतो. खऱ्या विचारवंताला आपले प्रभावक्षेत्र चांगल्या प्रकारे माहीत असते आणि आपल्या प्रभावाचा केव्हा पुरेपूर वापर करायचा आणि केव्हा नाही, याची उत्तम जाणही असते.

हर्डीकर जी भूमिका घेऊन जे राजकारण करत आले आहेत, त्याला आजवर कुठेच ठोस यश आलेले नाही, ही गोष्ट खरी असली तरी ते त्याबाबतीत कुठलीही तडजोड करायला आजही तयार नाहीत. ते निराश झालेले नाहीत, त्यांचा भ्रमनिरास झालेला नाही आणि त्यांची उमेदही थकलेली नाही. 'एकाच वेळी अनेक विषयांवर काम करत असल्याने निराशा येत नाही,' असे ते सांगतात. 'माझ्या कामाला, व्यासंगाला उद्देश आहे, पण टार्गेट नाही,' असेही त्यांचे म्हणणे आहे. विधायक राजकारण करू पाहणाऱ्या कुठल्याही व्यक्तीचे यश मुक्कामापेक्षा प्रवासात असते.

गेली काही वर्षे हर्डीकर 'मला कुणी मराठीतला जॉर्ज ऑर्वेल म्हटलं तर आवडेल' असे जाहीरपणे बोलून दाखवत आहेत. त्यांचा हा दावा कुणी खोडून काढायचा प्रयत्न केला नसला, तरी त्यावर कुणी शिक्कामोर्तबही केलेले नाही. हर्डीकरांचे लेखन पेलवण्याजोगे समीक्षक मराठीत आहेत का, हाही प्रश्नच असल्यामुळे तसे होणे साहजिकच म्हणावे लागेल. जॉर्ज ऑर्वेल आणि विनय हर्डीकर यांच्यात 'राजकीय बांधिलकी मानून लेखन करणे' हे अतिशय लक्षणीय साम्य आहे. 'जनांचा प्रवाहो चालिला' या हर्डीकरांच्या पहिल्या पुस्तकाचे स्वरूप ऑर्वेलच्या 'होमेज टू कॅटलोनिआ'वर बेतलेले आहे.

आणीबाणीविषयी हर्डीकरांनी त्यांच्या परीने जो निषेध व्यक्त केला, त्यापायी त्यांना दोन महिन्यांचा कारावास भोगावा लागला. त्या काळातील येरवडा तुरुंगातील अनुभव सांगताना त्यांनी त्याआधीचे देशातील, आजूबाजूच्या समाजातील वातावरण आणि त्यांची मानसिक अवस्था आणि येरवड्यातून बाहेर आल्यानंतर मराठीतल्या वेगवेगळ्या लेखकांच्या भेटीगाठींपासून धुळ्याला जाऊन जनता पक्षाच्या एका उमेदवाराच्या प्रचारासाठी केलेली मेहनत यांचा आढावा घेतला आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, आविष्कारस्वातंत्र्य, लोकशाही, प्रामाणिकपणा व सहानुभूती या मूल्यांचा निष्ठा म्हणून हर्डीकर कसा कसा स्वीकार करत गेले, याचा अतिशय वेधक आणि प्रांजळ आलेख त्यांनी या पुस्तकातून काढल्यामुळे 'जनांचा प्रवाहो चालिला' हे मराठीतील 'होमेज टू कॅटलोनिआ' म्हणायला हरकत नाही!

ऑर्वेलप्रमाणेच हर्डीकर यांनीही काही काळ पत्रकार म्हणून काम केले आहे. ऑर्वेलप्रमाणेच हर्डीकरही आपले आयुष्य, त्याभोवतालच्या घडामोडी यांची तटस्थपणे चिकित्सा करतात, स्वत:ला सतत तपासून पाहतात. त्यामुळेच ते 'स्वप्न नको; सत्य पाहू या',

'बहुत पाया, कुछ खोया' यासारखे आत्मपरीक्षणात्मक लेख लिहू शकतात. ऑर्वेलप्रमाणे हर्डीकरही ध्येयवाद, त्याग आणि व्यवहारवाद या दोन आघाड्यांवर सतत वावरत असतात. ऑर्वेलची मुख्य ओळख ही लोकशाहीचा पुरस्कर्ता आणि राजकीय-सामाजिक भाष्यकार म्हणून आहे. स्पष्ट विचार, स्वच्छ भाषा हे ऑर्वेलप्रमाणेच हर्डीकर यांच्याही लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ऑर्वेलप्रमाणेच हर्डीकरांनीही मोजकीच पण साहित्यसमीक्षाही केली आहे. त्यांनी मर्ढेकरांच्या कवितांची केलेली 'चरित्रात्मक समीक्षा' हा त्याचा नमुना आहे. त्याचबरोबर भालचंद्र नेमाडे यांच्या 'हिंदू', मीना देशपांडे यांच्या 'हुतात्मा' या कादंबऱ्यांची त्यांनी केलेली समीक्षा उत्तम म्हणावी अशी आहे. ऑर्वेलने चार्ल्स डिकन्सवर, टॉलस्टॉय यांच्यावर लिहिले असले तरी अनेकांना ते माहीत नसते, ज्यांना असते त्यांनी ते वाचलेले नसते. पण 'ॲनिमल फार्म', 'नाइन्टीन एटीफोर' या कादंबऱ्या मात्र बहुतेकांना माहीत असतात, अनेकांनी त्या वाचलेल्या असतात, पण त्यांच्या लेख-निबंधांचे चार संग्रह मात्र बहुतेकांनी वाचलेले नसतात. हर्डीकरांबाबतही काहीसा असाच प्रकार झालेला आहे. त्यांची पुस्तके अनेकांना ऐकून माहीत असतात, काहींनी त्यातली काही वाचलेलीही असतात. पण 'जनांचा प्रवाहो चालिला' ते 'देवाचे लाडके' एकसलग वाचलेली नसतात. त्यामुळे ते हर्डीकरांच्या 'फर्स्ट पर्सन डॉक्युमेंटरी'चे क्रमशः भाग आहेत, हे त्यांच्या लक्षात येत नाही.

काहींची अशीही तक्रार असते की, हर्डीकरांच्या लेखनात सतत 'मी' येतो, त्यामुळे त्यांचे लेखन त्रासदायक होते. हा आक्षेप घेणाऱ्यांच्या हे लक्षात आलेले नसते की, हर्डीकरांच्या लेखनातील 'मी' हा आत्मसमर्थनात्मक नसून तो त्या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार म्हणून आलेला असतो. ते ज्या विषयावर लिहितात, त्याच्या प्रत्यक्ष अनुभवाचे रूप म्हणून तो आलेला असतो. त्यामुळे त्यांच्या लेखनाला विश्वासार्हता येते. ज्याला आपल्या प्रत्यक्ष सहवासाचा, अनुभवाचा परिसस्पर्श झालेला नसतो, अशा विषयांवर हर्डीकर सहसा लिहीत नाहीत. काल्पनिक, मनोरंजनात्मक, लोकानुनयी किंवा कुणाच्या तरी बाजूचे लेखन करण्यात हर्डीकरांना स्वारस्य नसते. आपला अनुभव, अभ्यास आणि विचार हा त्यांच्या लेखनाचा गाभा असतो. त्यामुळे त्यातून येणारे निष्कर्ष ते निर्भीडपणे मांडण्याचे धाडस दाखवतात. त्यांचे लेख आणि 'श्रद्धांजली', 'देवाचे लाडके' या संग्रहातील त्यांची व्यक्तिचित्रे पाहिली की, ते कुणाच्याही सहज ध्यानात येईल! हर्डीकर कधी काळी संघात होते, ज्ञानप्रबोधिनीमध्ये त्यांनी दशकभर काम केले, हा त्यांचा इतिहास ते विसरले असले तरी महाराष्ट्रातील अनेक जण मात्र विसरलेले नाहीत. ते त्यांच्या लेखनाकडे त्याच नजरेतून पाहतात. हर्डीकरांनी सात-आठ वर्षे 'इंडियन एक्स्प्रेस' या आघाडीच्या इंग्रजी दैनिकात शोध पत्रकारिता केली आहे, वीसेक वर्षे त्यांनी शेतकरी संघटनेमध्ये काम केले आहे, मात्र शरद जोशी भाजपच्या गोटात सामील झाले तेव्हा हर्डीकर त्यांच्यासोबत गेले नाहीत, याकडे मात्र सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात असावे! एखाद्या व्यक्तीच्या भूतकाळावरूनच तिच्या वर्तमानातील आचार-विचारांचे विश्लेषण करायचे, हा मराठी समीक्षेला आणि विचारविश्वालाच जडलेला दुर्धर आजार आहे. त्यावर जोवर अक्सीर इलाज केला जाणार नाही तोवर भूतकाळातील लेबलांच्या पगड्यातून मराठी विचारविश्व आणि साहित्यसमीक्षा बाहेर पडणार नाही. आणि हे जोवर होत नाही तोवर हर्डीकरांना मराठीतील 'जॉर्ज ऑर्वेल' म्हणायला त्यांचे आणि ऑर्वेलचे लेखन न वाचताच नकार देणारेच जास्त निघण्याची शक्यता आहे.

**– राम जगताप**
संपादक

●●●

# भव शङ्करदेशिक मे शरणम् ।

*दिनांक २५ एप्रिल रोजी थोर भारतीय तत्त्वज्ञ व युगप्रवर्तक संत श्री आदि शंकराचार्य यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्त ज्येष्ठ अभ्यासिका विनिता तेलंग यांचा लेख : संपादक*

आचार्य आद्य शंकराचार्य यांचं चरित्र वाचताना आचार्यांनी केलेला धर्मप्रचार, केलेल्या शास्त्रचर्चा वाचून बुद्धी स्तिमित होते पण या पलीकडे जाऊन मनात सदैव रेंगाळत रहातात त्यांची रसाळ स्तोत्रं.' 'स्तूयते अनेन इति स्तोत्रम्' देवाची स्तुती हा स्तोत्राचा मूळ भाव व फलाची कांक्षा हा मनुष्य स्वभाव.



आचार्यांची स्तोत्रं देखील ईश्वराच्या विविध मनोहारी रूपांचं वर्णन करतात, त्या स्तोत्रांच्या पठणामुळे होणारे लाभ सांगतात, पण त्यासोबतच ती आपल्या 'आतल्या' चैतन्याला साद घालतात ! आचार्यांच्या स्तोत्रांचं पठण हा एक अत्यंत आल्हाददायक अनुभव असतो. अतिशय प्रासादिक, गेय, शब्दलालित्यानं नटलेली ही स्तोत्रं म्हणताना आपलं शब्दभांडार कितीतरी समृद्ध होतं. स्तोत्रं म्हणताना त्यातले यमक, अनुप्रास असे शब्दालंकार वाणीची परीक्षा पहातात. त्यातली अक्षरांची पुनरावृत्ती, एकेका चरणात असलेले हेलकावे, वळणं, कधीकधी दमछाक करणारे – एकेका चरणाइतकी लांबी असलेले एकेक शब्द, पण एकदा या मार्गावरून आपली वाणी धावायला लागली तर मग तिला थांबावंसं वाटत नाही ! आचार्यांच्या शब्दभांडारातून उगम पावणाऱ्या अनेक सौष्ठवपूर्ण, मधुर, सुस्पष्ट, शुद्ध, नादमय स्तोत्रांच्या प्रवाहांमधे आपण वाहात रहातो.

अनेक वृत्तं आणि विविध पदसंख्या असलेली पण निरपवादपणे प्रासादिक, श्रुतिमधुर असलेली आचार्यांची स्तोत्रं नित्य म्हणणं ही एक प्रकारची वाचिक उपासनाच.

वाणी- चित्त-विचार सर्वांची शुद्धी करणारी ही स्तोत्रं!

काही स्तोत्रं बालवयात अगदी आवर्जून ऐकवावीत, पाठ करून घ्यावीत अशी सुलभ, गोड ! त्याला असलेली लय इतकी सुंदर की टाळ्या वाजवत म्हटली तर लहान बाळसुद्धा नादावतं अशी ! जसं श्रीकृष्ण व श्रीराम यांचं एकरूपत्व सांगणारं अच्युताष्टक ..

अच्युतं केशवं रामनारायणं ।
कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिम् ।
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभं ।
जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।

यात गंमत अशी आहे की, यात श्रीकृष्ण व श्रीराम यांची कथा एकत्र गुंफलेली आहे ! सोपं वाटलं तरी 'धेनुकारिष्टकोऽनिष्टकृद्वेषिणां' किंवा 'विद्युदुद्योतवत्प्रस्फुरंद्वादसं' म्हणताना जिव्हेची परीक्षा सुरू होतेच !

असंच ताल धरायला लावणारं दुसरं अष्टक .. नितांतमधुर गोविंदाष्टक ..
'सत्यं ज्ञानमनन्तं नित्यमनाकाशं परमाकाशं' यानं

सुरू होणारं. यातले गोविंदाचे गुण गाताना आपण लडिवाळ गोपी आहोत, यमुनेच्या तीरावरल्या त्याच्या क्रीडा प्रत्यक्ष पाहात आहोत आणि त्याचवेळी अनादी अनंत विश्वव्यापी अशा रुपाला अनुभवत आहोत असं वाटतं..

आणि ते सर्वात लाडकं श्रीकृष्णाष्टक ! त्याला कसं दूर ठेवायचं ? 'भजे व्रजैकमण्डनं समस्तपापखण्डनं' म्हणताना जाणवणारं श्रीकृष्णाचं सामर्थ्य, त्याचं 'नमामि मेघसुंदरं तडित्प्राभालसत्पटम्' असं नयनमनोहर रूप - आणि ते मनात आणून -

'यदा तदा यथा तथा तथैव कृष्णसत्कथा ।
मया सदैव गीयतां तथा कृपा विधीयताम् ।।
अशी होणारी आपली अवस्था..'

तसंच डोळ्यांसमोर श्रीमूर्त आणि अंगावर रोमांच उभे रहातात, पांडुरंगाष्टक म्हणताना.. चन्द्राकार वाहणाऱ्या भीमेच्या काठावरल्या महायोगपीठाला आचार्यांचे पाय लागले असतील.. त्या सावळ्या, मनोहर, सगुण साकार परब्रह्माचं दर्शन त्यांनी घेतलं असेल.. अठ्ठावीस युगं भक्ताची वाट पहात तिष्ठणाऱ्या विठ्ठलानं हा महायोगी भक्त पाहिला असेल.. किती अलौकिक असेल तो सोहळा !

महायोगपीठे तटे भीमरथ्या ।
वरं पुण्डरीकाय दातुं मुनींद्रैः ।
समागत्यतिष्ठन्तमानन्दकन्दं ।
परब्रह्मलिङ्गं भजे पाण्डुरंगम् ।।

आणि शब्दातूनच क्षेत्ररक्षक कालभैरवाचं सामर्थ्य दर्शवणारं -

देवराजसेव्यमानपावनाङ्घ्रिपंङ्कजम् ।
व्याल यज्ञ सूत्रमिन्दुशेखरं कृपाकरम् ।
नारदादि योगिवृन्दवंदितं दिगंबरम् ।
काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।

हे कालभैरवाष्टक म्हणताना एक आगळंच सामर्थ्य अंगी संचारतं. काशीच्या निवासात आचार्यांनी अनेक सुंदर स्तोत्रं रचली आहेत. धर्मपुरी काशीमधे वेदचर्चा करतानाही त्या क्षेत्राच्या पालनकर्त्या, पुण्यतोया गंगेचा विसर कसा पडणार? तिच्या रमणीय, पवित्र, शुद्ध रुपासारखंच तेरा श्लोकी स्तोत्र आचार्यांनी रचलं ..

देवि सुरेश्वरि भगवति गङ्गे ।
त्रिभुवनतारिणी तरलतरंङ्गे ।
शंकरमौलि विहारिणि विमले ।
मम मतिरास्तां तव पदकमले ।।

नर्मदेचा लयबद्ध, वेगवान प्रवाह पाहून रचलेलं तिचं -

'सुलक्षनीरतीरधीरपक्षिलक्षकूजितम' असं सर्वांगसुंदर वर्णन करणारं आणि साक्षात चैतन्यमयी नर्मदेची भेट झाली असं वाटावं असं स्तोत्र - नर्मदाष्टक !

सबिन्दु-सिन्धु-सुस्खलत्तरङ्ग-भङ्ग-रञ्जितम् ।
दिष्त्सु पापजात जातकारि-वारि-संयुतम् ।
कृतान्तदूत- कालभूत भीतिहारि-वर्मदे ।
त्वदीय-पादपञ्कजं नमामि देवि नर्मदे ।।

अखेरच्या काशीयात्रेत शक्तिदेवतेचं दर्शन घेताना स्फुरलेलं अन्नपूर्णाष्टक म्हणताना त्या विश्वजननीला तिच्या विविध नावांनी सादावलं ..

नित्यानंदकरी वराभयकरी सौन्दर्यरत्नाकरी ।
निर्धूताखिलदोषपावनकरी प्रत्यक्ष माहेश्वरी ।
प्रालेयाचलवंशपावनकरी काशीपुराधीश्वरी ।
भिक्षां देहि कृपावलम्बनकरी मातान्नपूर्णेश्वरी ।।

'योगानन्दकरी, रिपुक्षयकरी, ओंकारबीजाक्षरी, विज्ञानदीपाङ्कुरी, क्षत्रत्राणकरी, कृपासागरी ..'

असं तिचं वर्णन करून तिच्याकडे भिक्षा मागितली

---

अश्रू येणं हे माणसाला हृदय असल्याचं द्योतक आहे.

ती 'ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वती'.. ज्ञान व वैराग्य यांनी मला पूर्णत्व येऊदे, अशी !

आचार्यांच्या स्तोत्रांमधली सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आहेत ती त्यांची वेदान्त सांगणारी, जीवनावर भाष्य करणारी स्तोत्रं. ही आपल्याला अंतर्मुख करतात. सत्याचा प्रकाश दाखवतात. कर्मकांडातून धर्माला बाहेर काढून आचार्यांना आत्मज्ञनाच्या ज्या मार्गावर लोकांना न्यायचं होतं तो मार्ग दाखवणारी ही स्तोत्रं.

सकाळी उठल्याउठल्या आचार्यांचं 'परब्रह्मणः प्रातःस्मरणस्तोत्रम्' म्हणावं ..

प्रातःस्मरामि हृदि संस्फुरदात्मतत्वम् ।
सच्चित्सुखं परमहंसगतिं तुरीयम् ।

उठल्याउठल्या, दिवसाला सामोरं जाताना – 'मी आहे' या विश्वाला भरून राहिलेल्या आत्मतत्त्वाच्या सोबतीचं आश्वासन आपल्याला लाभतं आणि खरंच चैतन्याचं ऊर्जामय स्फुरण घेऊन आपला दिवस सुरू होतो.

आचार्यांची गुरुस्तोत्रं पठणीय आणि आपल्याला नम्रभाव शिकवणारी आहेत. षट्पदी तर पसायदान, करुणाष्टकं या सारख्या मंगल प्रार्थनांची जननीच !

अविनयमपनय विष्णो दमय मनः शमय विषयमृगतृष्णाम्

भूतदयां विस्तारय तारय संसारसागरतः ।।

म्हणायला अतिशय गोड आणि छोटं, पाठ करून नित्य म्हणावं असं हे स्तोत्र ..

चर्पटपञ्जरिकेसारखं जीवनाचं सत्य सांगणारं स्तोत्र तर त्यातल्या आशयामुळं नि शब्दरचनेमुळं म्हणताना गंमतही येते नि आपण नकळत चिंतनमग्न होतो.

आचार्यांनी एकदा एका जराजर्जर वृद्धाला 'डुकृञ' हा धातू पाठ करताना पाहिलं. या वयात पाठांतराची चिकाटी होती हे खरं; पण परमार्थसाधना करण्याच्या वयात ही भौतिक विद्या मिळवून काय साधणार, असं वाटून त्यांनी या स्तोत्रात मानवाचं संपूर्ण जीवनचक्र सांगितलं ..

दिनमपि रजनी सायं प्रातः शिशिरवसन्तौ पुनरायातः।
कालः क्रीडति गच्छत्यायुस्तदपि न मुञ्चत्याशावायुः।

भज गोविन्दं भज गोविन्दं गोविन्दं भज मूढमते ।
प्राप्ते संनिहिते मरणे न हि न हि रक्षति डुकृञ करणे ।।

साधकाला किती कमीतकमी गरजा असाव्यात हे सांगणारं कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः देखील असंच छोटंसं अर्थपूर्ण विचारप्रवण स्तोत्र आहे ..

सगुण रूपाची मानसपूजा जशी सांगितली आहे तशीच आचार्यांनी सांगितली आहे. निर्गुण निराकाराची मानसपूजा – 'परापूजा'.

त्याच्या शेवटाला असलेल्या श्लोकात या सुंदर स्तोत्राचं सार आहे ..

आत्मा त्वं गिरिजा मतिः सहचराः प्राणाः शरीरं गृहं ।
पूजा ते विविधोपभोगरचना निद्रा समाधिस्थिती ।
सञ्चारः पदयोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वा गिरो।
यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ।।

शिवमानसपूजा, शिवापराधक्षमापन स्तोत्र या प्रकारच्या स्तोत्रातला कळस म्हणजे देव्यापराध-क्षमापनस्तोत्र. या स्तोत्राची रचना करून आचार्यांनी जणू मातृऋण व्यक्त केलंय. भारतीय संकल्पनेतलं शक्तीरूप, स्त्रीचं विश्वमातृत्व याला दिलेली ही मानवंदना

तर आहेच, पण भारतीय मूल्यं मानणाऱ्या स्त्रीला तिच्या यथार्थ रूपाची, जबाबदारीची दिलेली ही जाणीव आहे असं वाटतं .. मी काहीही जाणत नाही – ना मंत्रतंत्र – ना पूजाविधी –ना तुझी स्तुती ... पण मी एवढं जाणतो की– 'कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ।।' आणि म्हणून हे जगन्माते, तुझ्या मागं मागं चालणं तुझं अनुकरण करणं इतकंच मी जाणतो, करतो..

हे स्तोत्र म्हणताना खरंच ऊर भरून येतो.

गुरू गोविंदयतींना शोधत ओंकारमांधाता पर्वतापर्यंत आचार्य पोचले होते तेव्हा शिष्य म्हणाले की, आत्ता स्वामी समाधीत आहेत. भेट मिळणार नाही. तेव्हा 'ठीक आहे' म्हणून आचार्यांनी सद्गुरुस्तुती गात पर्वतालाच प्रदक्षिणा केली. ते अतिशय भावपूर्ण

नारायण नारायण जय गोविंद हरे ।
नारायण नारायण जय गोपाल हरे ।
करुणापारावारा वरुणालयगंभीरा ।
नारायण नारायण जय गोविंद हरे ।।

हे आर्त, गंभीर, मृदुल शब्द ऐकून हर्षभरानं सद्गुरुच धावत आले तर त्यात काय नवल !

गोविंदयतींच्या आश्रमातल्या अन्य शिष्यांनी विचारलं, – 'इतक्या लहान वयात ही प्रगल्भता ही ज्ञानसंपन्नता कुठून आली? आपण कोण आहात बालसंन्यासी?' त्यावर एका अलौकिक स्तोत्रातून उत्तर दिलं 'शिवोहम् शिवोहम !' आपलं खरं शिवस्वरूप आत्मस्वरूप सांगणारं हे स्तोत्र आत्मषटक् किंवा निर्वाणषटक् म्हणून प्रसिद्ध आहे.

मनोबुद्ध्यहंकार चित्तानिनाहं ।
नच श्रोत्रजिव्हे नच घ्राणनेत्रे ।
नच व्योमभूमिर्न तेजो न वायुः ।
चिदानंद रूपः शिवोऽहम् शिवोऽहम् ।।

आचार्यांनी धर्माचा खरा अर्थ सांगण्याकरता अल्प आयुष्यात प्रचंड अशी ग्रंथसंपदा, स्तोत्ररचना केल्या. आजच्या काळातही ही स्तोत्रं मनाला उभारी देतात. आपल्या सत्य स्व–रूपाची जाणीव करून देऊन, भेदभाव संपवून आपल्याला कल्याणकारी मानवतेच्या मार्गावर चालायला प्रेरणा देतात ..

शंकराचार्यांचे शिष्य तोटकाचार्य यांनी आचार्यांकडे मागितलेलंच दान शेवटी मागावं वाटतं –

मी अज्ञानी आहे. शास्त्राचा अंशही मी जाणत नाही, ना माझ्याकडे अर्पण करण्यास काही आहे. माझ्यावर कृपा करून आपणच माझं रक्षण करा !

विदिता न मया विशदैककला
न च किञ्चन काञ्चनमस्ति गुरो
द्रुतमेव विधेहि कृपां सहजां
भव शङ्करदेशिक मे शरणम् ।।

**– विनीता तेलंग**
ज्येष्ठ अभ्यासिका
मुंबई

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहे.**

**– संपादक**

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

### ६ मार्च २०२३ – होळी

मराठी फाल्गुन महिन्यात येणारा रंगांचा सण म्हणजे होळी आणि रंगपंचमी. ६ मार्चला मुलांनी साधे कपडे परिधान केले होते. होळी का साजरी करतात ते शिक्षकांनी सांगितले. 'होलिका'ची गोष्ट मुलांना दृक् श्राव्य माध्यमाच्या (AV lesson) द्वारे दाखवण्यात आली.

वनस्पतींपासून तयार केलेल्या नैसर्गिक रंगांचा वापर करून शिक्षकांनी मुलांसोबत रंगपंचमीचा सण साजरा केला.

- नर्सरी – स्पंजच्या सहाय्याने ठसेकाम.
- ज्यूनियर के. जी. – पिचकारीचे चित्र रंगवणे.
- सिनीयर के. जी. – विविध रंगांचे ठसेकाम.

या कृती घेतल्या गेल्या.

### १८ मार्च – पालक सभा

२२ – २३ या शैक्षणिक वर्षातील शेवटची पालक सभा या दिवशी घेण्यात आली. २७ मार्च पासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या निरीक्षणाचे वेळापत्रक, तसेच त्याची विषयानुरूप करून घेण्याची तयारी याबद्दल पालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

### २२ मार्च – गुढीपाडवा

हिंदू नवीन वर्षाचा शुभारंभ गुढीपाडवा या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत करायचे, झाडांना फुटणारी नवीन पालवी, शहरात निघणारी स्वागतयात्रा या सर्वांची माहिती मुलांना देण्यात आली.

### २४ मार्च – एकत्रित संगीत तासिका

दर आठवड्यातून एक तासिका संगीतासाठी घेतली जाते. या अंतर्गत विविध भाषांतील गाणी म्हणणे विविध वाद्यांची तोंडओळख यांसारख्या कृतींचा अनुभव मुलांना दिला जातो.

१०:३० ते ११:०० – नर्सरीचे – २ वर्ग

१२:४० ते १:०० – ज्यूनियरचे – ३ वर्ग

१:०० ते २:०० – सिनीयरचे – ४ वर्ग

या सर्वांची एकत्रितपणे या वेळेत ही तासिका घेण्यात आली.

आमच्या शाळेतील ज्येष्ठ संगीत शिक्षिका वीणा जोशी या तासिकेला मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या.

तसेच सौ. रागिणी केळसकर या आमच्या शिक्षिकेने गिटार या वाद्याची ओळख मुलांना करून दिली व मुलांनी गायलेल्या 'चॉकलेटचा बंगला' या गाण्याला गिटारची साथ केली.

### २७ मार्च – १२ एप्रिल – वार्षिक (द्वितीय) निरीक्षण

या दरम्यान इंग्रजी, गणित, परिसर अभ्यास या विषयांतील शिकवलेल्या संकल्पनांवर आधारित निरीक्षण घेण्यात आले. काही संकल्पनाचे निरीक्षण कार्यपत्रिकांच्या आधारे, तर काही प्रत्यक्ष कृतीतून किंवा तोंडी उत्तरांच्या आधारावर अशा पद्धतीने हे निरीक्षण नोंदवले गेले.

- नर्सरी व ज्यूनियर के.जी. – १०:३० ते १२:००
- सिनीयर – १:३० ते ३:००

**११ एप्रिल – सुरक्षा उपाय (Safety Measures) चांगला व वाईट स्पर्श (Good and Bad Touch)**

सार्वजनिक, तसेच गर्दीच्या ठिकाणी स्वत:ची काळजी व सुरक्षा कशी घ्यायची? चांगला व वाईट स्पर्श म्हणजे काय? तो कसा ओळखायचा? याची माहिती शिक्षकांनी दिली. घरातील विजेच्या व धारदार वस्तूंशी खेळायचे नाही. अनोळखी व्यक्तींकडून भेट घ्यायची नाही यासारख्या गोष्टी का करू नयेत याची माहिती सुद्धा मुलांना दिली.

**१२ एप्रिल – बनी टमटोला एकत्रीकरण**

स्काऊट गाईड उपक्रमाचा पूर्व प्राथमिक विभागातील भाग म्हणजे बनी टमटोला ! दर बुधवारी बनीचे चित्र असलेला ॲप्रन घालून सर्व विद्यार्थी येतात. वर्षभर अनेक उपक्रम या अंतर्गत घेतले जातात. शाळेतील शिक्षक व ठाणे जिल्हा स्काऊट गाईडचे प्रमुख श्री. केशव चौधरी सर यासाठी उपस्थित होते. 'बनी टमटोला' ची प्रार्थना झाल्यानंतर श्री. केशव सरांनी मुलांना एक सुंदर गाणे शिकवले. तसेच एक-दोन वेगळ्या प्रकारच्या टाळ्याही शिकवल्या. ज्यूनियर व सिनियर या दोन वर्षांचा बनीचा उपक्रम यशस्वीरित्या पार केल्याबद्दल सरांच्या हस्ते सिनीयरच्या मुलांना प्रशस्तीपत्रक प्रदान करण्यात आले.

सर्व विद्यार्थ्यांना प्रगती पुस्तकासोबत हे प्रशस्तीपत्रक दिले जाईल.

**१७ एप्रिल ते २१ एप्रिल – छंद वर्ग**

वार्षिक निरीक्षणानंतर अंदाजे १ आठवडा हा छंद वर्ग घेतला जातो. कागदी डिश, जुन्या सी. डी., पिस्त्यांची साले, घोटीव कागद यासारख्या सहज उपलब्ध असणाऱ्या वस्तूंमधून सुंदर वस्तू मुलांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केल्या. एक दिवस मुलांना लिंबू सरबत व सँडविच सारखा खाऊ तयार करून खाण्याचा उपक्रमही घेतला गेला.

- नर्सरी व ज्यूनियर के. जी. – १०:३० ते १२:००.
- सिनीयर – १:३० ते ३:००

या वेळेत छंद वर्ग घेतले गेले.

**२८ एप्रिल – निकाल**

द्वितीय निरीक्षणाचे नोंदी असलेले निकालपत्र / प्रगतीपुस्तक पालकांना शुक्रवार २८ एप्रिल रोजी देण्यात येईल. मुलांनी सोडवलेल्या कार्यपत्रिका (worksheets) पालकांना या वेळी दाखवल्या जातील.

- नर्सरी व ज्यूनियर के. जी. – १०:०० ते १०:३०
- ज्यूनियर के. जी. – १०:३० ते ११:००
- सिनीयर – ११:३० ते १२:००

अशा तऱ्हेने २२-२३ या शैक्षणिक वर्षाची सांगता झाली.

## बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय

**दीक्षान्त समारंभ**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे यांचा दीक्षान्त समारंभ दि. २० एप्रिल २०२३ रोजी पतंजली सभागृहात दुपारी १.३० वाजता पार पडला. या समारंभाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट, डॉ. सुधाकर आगरकर, प्राध्यापक, अधिष्ठाता, व्ही पी एम अकादमी ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन अँड रिसर्च, श्री. त्रिविक्रम बेंद्रे, खजिनदार, विद्या प्रसारक मंडळ हे प्रमुख पाहुणे होते. सोबतच सर्व विभागांचे विभाग प्रमुखही या सोहळ्याला उपस्थित होते. या दीक्षान्त समारंभामध्ये पदवी आणि पदव्युत्तर मिळून १४ विभागांमधून प्रथम १० क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळा यावेळी पार पडला.



प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील हा सोनेरी दिवस असतो असे सांगत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोझेस कोलेट यांनी आपला आनंद व्यक्त केला. डॉ. सुधाकर आगरकर यांनी सगळ्या विद्यार्थ्यांना पदवीदान सोहळ्यातील शपथेचे महत्त्व समजावत शपथेचे वाचन केले. त्रिविक्रम बेंद्रे, खजिनदार यांच्या मोलाच्या मार्गदर्शनपर शब्दांनी विद्यार्थ्यांचा हुरूप वाढवला. सभागृहात विद्यार्थी म्हणून शिरलेली मुले पदवीदान सोहळ्यानंतर ग्रॅज्युएट होऊन मोठ्या आनंदात बाहेर पडली.

**''लोकसंग्राम'' वृत्तपत्राचे प्रकाशन सोहळा**

विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय ठाणे येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रात वृत्तपत्र व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी ''संपादक : कार्य आणि जबाबदारी'' या विषयाचा सामुदायिक पद्धतीने तयार केलेल्या प्रकल्प अहवाल म्हणून 'लोकसंग्राम' या दैनिकाचे प्रकाशनसोहळा पतंजली सभागृह दिनांक दि. २८ एप्रिल २०२३ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्रंथपाल व केंद्र संयोजिका सौ. कादंबरी मांजरेकर, अभ्यासक्रमाचे मार्गदर्शक प्रा. दाभोळकर व प्रा. शैलेश कसबे उपस्थित होते. तसेच वृत्तपत्रविद्या जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रमाचे २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी उपस्थित होते. वृत्तपत्राचे संपादकाचे कार्य राजन वेलकर तर उपसंपादक रुपेश दातखिळे यांनी जबाबदारी स्वीकारली होती. इतर प्रतिनिधीनी वृत्तलेखन, स्तंभ लेखन, लेख, व्यंगचित्र, ताज्या घडामोडी, दिनविशेष अशा निरनिराळ्या विषयांवरील लेखन जबाबदारी स्वीकारली होती. याप्रसंगी यावर्षीचे विद्यार्थी व मागील वर्षीचे विद्यार्थी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे आवर्जून आभार मानले. संपादक वेलकर यांनी संपादन व मुद्रीतशोधन करताना येणाऱ्या अडचणींबाबत आलेला अनुभव व्यक्त केला. सह संपादक रूपेश दातखिळे यांनी ही संपूर्ण टीम बद्दल येणारा अनुभव मनोगतातून मांडला. प्रकाशन सोहळ्याच्या प्रसंगी विषय तज्ज्ञ शैलेश कसबे सर, राजेश दाभोळकर सर व कादंबरी मांजरेकर मॅडम यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन बा.ना.बांदोडकर महाविद्यालय डिप्लोमा इन जर्नलिझमच्या विद्यार्थ्यांनी केले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मनीषा चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाची सांगता किरण वाघमारे यांनी आभार मानून केली.



**वार्षिक बक्षीस समारंभ**

बा.ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाचा वार्षिक बक्षीस समारंभ २९ एप्रिल २०२३ रोजी पतंजली सभागृहात संपन्न झाला. यावेळी डॉ. सुधाकर आगरकर व श्री मिलिंद बल्लाळ, संपादक ठाणे वैभव विशेष अतिथी म्हणून लाभले होते. डॉ. उर्मिला कुमावत, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पती शास्त्र विभाग यांनी केलेल्या प्रास्तविकानंतर डॉ. मोजेस कोलेट, प्राचार्य, बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे यांनी प्राचार्यांचा अहवाल सादर केला. ज्यामध्ये २०२१-२०२२ या संपूर्ण शैक्षणिक वर्षात ऑनलाईन व

ऑफलाइन पद्धतीने घेण्यात आलेले विविध कार्यक्रम, विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्त्व, त्यांना मिळालेली पारितोषिके, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मिळवलेले यश, माजी विद्यार्थ्यांनी केलेली कामगिरी इत्यादी सर्वांचा आढावा होता. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, खेळ समिती, सांस्कृतिक मंडळ, संयुजा समितीच्या प्रतिनिधींनी त्यांचे अहवाल सादर केले.

२०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षाचे 'वार्षिक संयुजा' याचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. सुधाकर आगरकर व श्री. मिलिंद बल्लाळ, संपादक 'ठाणे वैभव' यांच्या हस्ते 'संयुजा प्रकाशन' सोहळा संपन्न झाला. डॉ. सुधाकर आगरकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या. त्यानंतर महाविद्यालयातील विविध स्पर्धांमध्ये विजेते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी मिळालेल्या यशाबद्दल देखील त्यांचा सत्कार करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. उर्मिला कुमावत यांनी केले, तर कु. प्रियांका चव्हाण, सहाय्यक प्राध्यापक यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले व राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.



**द अमेरिकन लायब्ररी वार्षिक सदस्यत्व**

बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने 'द अमेरिकन लायब्ररी', दोस्ती हाऊस, बांद्रा या ग्रंथालयाचे वार्षिक सदस्यत्व (एप्रिल २०२३ ते मार्च २०२४) या कालावधीकरता घेतले.

**ग्रंथालय विभाग**

ग्रंथालय विभागातर्फे ११ एप्रिल २०२३ रोजी 'महात्मा ज्योतिबा फुले' यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला व माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले.




**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**प्रात्यक्षिक आणि अंतर्गत परीक्षा :-**

**सत्र IV च्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक आणि अंतर्गत परीक्षा खालील वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात आल्या.**

| | | |
|---|---|---|
| वर्ग चाचणी | 1st एप्रिल | 5.00-7.00 pm |
| अतिरिक्त वर्ग चाचणी | 5th एप्रिल | 5.00-7.00 pm |
| ड्राफ्टिंग प्लीडिंग कन्व्हेंसींग II | 3rd एप्रिल | 4.00-7.00 pm |
| अतिरिक्त परीक्षा ड्राफ्टिंग प्लीडिंग कन्व्हेंसींग II | 22nd एप्रिल | 4.00-7.00 pm |

**सत्र VI च्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक आणि अंतर्गत परीक्षा खालील वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात आल्या.**

| | | |
|---|---|---|
| 1st मार्च | ड्राफ्टिंग प्लीडिंग कन्व्हेंसींग II | 5.15 pm -7.15 pm |
| 10th एप्रिल | अतिरिक्त वर्ग चाचणी | 5.00 pm -8.00 pm |

**सत्र VI च्या विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेण्यात आली त्याचे वेळापत्रक खालील प्रमाणे:**

| दिनांक | वेळ | विषय |
|---|---|---|
| २४/०४/२०२३ | सायं ५.३० | लवाद व समेट कायदा |
| २५/०४/२०२३ | सायं ५.३० | भारतीय पुरावा अधिनियम |
| २६/०४/२०२३ | दुपारी २.३० | बौद्धिक संपदा कायदा |
| २६/०४/२०२३ | सायं ५.३० | विमा विषयक कायदे |
| २७/०४/२०२३ | दुपारी २.३० | बँकिंग आणि व्यापारी कायदे |
| २७/०४/२०२३ | सायं ५.३० | वैद्यकीय कायदा |
| २८/०४/२०२३ | दुपारी २.३० | कॉन्फ्लिक्ट कायदा |
| २८/०४/२०२३ | सायं ५.३० | कायदा स्त्रिया व मुलांचा |

**विद्या प्रसारक मंडळाच्या टिएमसी विधी महाविद्यालयाने दिनांक ११ एप्रिल ते २० एप्रिल २०२३ या कालावधीत ७ दिवसांची विशेष व्याख्यानमाला आयोजित केली होती.**

डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि प्रा. हेतल मेशेरी यांनी ११ एप्रिल रोजी 'महिला आणि मुलांसाठी कल्याणकारी कायदे' या विषयावर ऑनलाइन व्याख्यान घेतले. भारतीय संसदेने, विधानसभेने, न्यायालयाने वेळोवेळी स्त्रिया आणि बालकासांठी तयार केलेल्या विविध तरतुदी आणि न्यायनिर्णयाची चर्चा करण्यात आली. महिलांनी वकीली क्षेत्रामध्ये किंवा न्यायव्यवस्थेमध्ये येण्यासाठी काय प्रयत्न केले पाहीजेत याचेही मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.



**दि. १२ एप्रिल** रोजी, डॉ. महेश बर्वे यांचे ''मेडिको-लीगल क्षेत्रातील सराव आणि करिअरच्या संधी'' या विषयावर व्याख्यान झाले. वेगाने विकसित होणाऱ्या या कायद्याच्या क्षेत्रात खूप काम आहे आणि यासाठी तरुण वकीलानी याचा अभ्यास करणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. आजच्या परिस्थितीमध्ये अनेकदा डॉक्टर किंवा इस्पितळाद्वारे आणि विरोधात दावे वाढत चालले आहे अशा वेळेस कायद्याच्या या क्षेत्रात अभ्यास करणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन डॉ. बर्वे यांनी केले.

**दि. १३ एप्रिल** रोजी, ॲड. अनंत गद्रे यांनी ''बँकिंग कायदा आणि करिअरच्या संधी'' या विषयावर संबोधित केले. बँकीग क्षेत्रात विधीच्या विद्यार्थ्यांना खूप मोठी संधी असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक बँकेत, आर्थिक संघटनेत वकीलाची गरज असते, रोज हजारो दावे तयार होत असून ते चालविणारे तज्ज्ञ वकील बँकेस हवे असतात. विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात वकीली केल्यास चांगली भरभराट होऊ शकेल.



**दि. १५ एप्रिल** रोजी कु. रश्मी महाजन-नाटेकर आणि कु. समता जोशी यांचे ''IPR: सराव आणि करिअरच्या

सगळेच निर्णय मनाने घेऊ नका; काही निर्णय बुद्धीलाही घेऊ द्या !

संधींची व्याप्ती'' या विषयावर व्याख्यान झाले. आयपीआर मध्ये काम करणाऱ्या अनेक लिगल फर्म असून तिथे विद्यार्थ्यांना असलेल्या संधी विषयी चर्चा करण्यात आली. शिवाय विदेशांमध्ये असलेल्या संधीचीही चर्चा करण्यात आली.

**दि. १८.०४.२३** रोजी, ''विम्याचा कायदा: सरावाची व्याप्ती आणि करिअरच्या संधी'' बोलताना ॲड. बलदेव राजपूत यांनी ''विमा ही आज प्रत्येक नागरिकांची गरज झाली असल्यामुळे प्रत्येक विमाधारक हा संभावित अशील होऊ शकतो. विम्याशी संबधित अनेक दावे असतात, यामध्ये विद्यार्थी चांगल्याप्रकारे वकीली व्यवसाय करू शकतो'' असे त्यांनी सांगितले.

**दि. १९.०४.२३** रोजी, ''दिवाणी आणि फौजदारी खटल्यातील पुरावा कायद्याचा वापर'' यावर बोलताना ॲड. सुनील परांजपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'पुरावा कायदा कसा अभ्यासावा?' याबद्दल सांगितले. कायद्याच्या कोणत्याही क्षेत्रात पुरावा कायदा कसे महत्त्वाचे काम करतो यावर त्यांनी मार्गदर्शन केले.



**दि. २०.०४.२३** रोजी, ''लवाद कायदा : सराव आणि करिअरच्या संधींची व्याप्ती'' या विषयावर ॲड. आशिष गोगटे यांनी मार्गदर्शन केले. पारंपरीक न्यायालयीन पद्धतीच्या बाहेर जाऊन लवादाद्वारे कशाप्रकारे दावे, वाद मिटविता येऊ शकतात व यामध्ये किती संधी आहे यावर त्यांनी मार्गदर्शन केले.



तृतीय विधीच्या विद्यार्थ्यांसाठी या सात दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार, प्रा. विनोद एच वाघ, प्रा. हेतल मिशेरी व इतर शिक्षक सहकारी, कर्मचारी यांनी वेळोवेळी मेहनत घेऊन ही व्याख्यानमाला यशस्वी केली.

**विद्या प्रसारक मंडळाच्या टिएमसी विधी महाविद्यालयाचा पदवी प्रदान सोहळा आणि वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा संपन्न.**

**दिनांक २९ एप्रिल २०२३** रोजी, विद्या प्रसारक मंडळाच्या टिएमसी विधी महाविद्यालयाचा पदवी प्रदान सोहळा संपन्न झाला. ठाणे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. अभय मंत्री, जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री अमित शेटे, ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्री. ईश्वर सूर्यवंशी हे या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. विद्या प्रसारक मंडळाचे डॉ. महेश बेडेकर यावेळी हजर होते. श्री. अभय मंत्री यांनी यावेळी विद्यार्थ्यांना न्यायाधीश होण्यासाठी आवश्यक असलेला प्रयत्न, अभ्यास व कष्ट घेण्याचा सल्ला दिला. त्यांनी न्यायाधिशाची भूमिका काय असते याची माहिती दिली. श्री. अमित शेटे यांनी त्यांच्या महाविद्यालयीन अनुभवाची आठवण करून दिली. चांगला वकील व न्यायाधीश होण्यासाठी विद्यार्थी अवस्थेपासूनच मेहनत करायला हवी असा सल्ला दिला. श्री. ईश्वर सूर्यवंशी यांनी वकील व न्यायाधिशासाठी स्वच्छ व चांगले चरित्र जपायला हवे. डॉ. बेडेकर यांनी

विद्यार्थ्यांना महाविद्यालयाशी आयुष्यभरासाठी संबंध प्रस्थापित करून महाविद्यालयांमध्ये असलेल्या नवनवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायची अपील केली. यावेळी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी कार्यक्रमाची रुपरेषा मांडली व ज्या विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त झाली आहे त्यांनी करोनाच्या परिस्थितीमध्ये कसा अभ्यास केला याची माहिती दिली. प्रा. विनोद वाघ यांनी सूत्र संचालन केले व पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. हेतल मिशेरी यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी जवळपास १५० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली तसेच वार्षिक पारितोषिकेही देण्यात आली.

यावेळी माजी विद्यार्थ्यांची संघटना विधी बंधचे अध्यक्ष ॲड. परांजपे, अँड. नलगे, ॲड. गोगटे हजर होते. यावेळी तृतीय विधीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.






रविवार दिनांक ३० एप्रिल रोजी सांगलीच्या भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन भारताचे विभाजन करणाऱ्या घटकांवर टीका स्पर्धेमध्ये डॉक्टर श्रीविद्या जयकुमार या न्यायाधीश होत्या.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

१) २१ एप्रिल २०२३ रोजी आयोजित केलेल्या टेक्निकल प्रश्नमंजुषा स्पर्धेत, कॉम्प्युटर विभागाच्या (तृतीय वर्ष) सार्थक प्रवीण तिवाड याला प्रथम पारितोषिक मिळाले व त्याला प्रथम Runner up Bind coding या विभागात मिळाले.

२) २९ एप्रिल २०२३ रोजी ताज लँड एन्ड, बांद्रा येथे टाईम्स ग्रुपच्या वतीने भव्य महाअंतिम सोहळ्याचे आयोजन केले. विषय होता "Speak for India" ही राष्ट्रीय स्तरावरील वादविवाद स्पर्धा होती. फ्रेडरल बँक व टाईम्स ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित केली. इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्सच्या विभाग प्रमुख डॉ. कीर्ती आगाशे यांनी स्पर्धेत Judge म्हणून काम पाहिले.

३) एस.एस. जोंधळ पॉलीटेक्निक (अंबरनाथ) यांनी, पेपर प्रेझेन्टेशन व प्रश्नमंजुषा च्या स्पर्धा २३ एप्रिल २०२३ रोजी आयोजित केली. सदर स्पर्धेत इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम विभागाच्या खालील विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकाविली.

**पेपर प्रेझेन्टेशन स्पर्धा –**

१) पार्थ जोशी, आदित्य जाधव – प्रथम पारितोषिक
२) गौरी खोडे, सामर्थ्य सुर्वे – द्वितीय Runner up
३) अथर्व खांडेराव, वैभव भगत – प्रथम Runner up

**टेक्निकल प्रश्नमंजुषा स्पर्धा –**

१) पार्थ जोशी व आदित्य जाधव (तृतीय वर्ष इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम द्वितीय Runner up

४) २९ एप्रिल २०२३ रोजी कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग व स्वराशी नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणीचा कार्यक्रम आयोजित केला. सदर शिबिर स्टाफ व विद्यार्थी वर्गासाठी मोफत होता.


लखलखते तारे पाहण्यासाठी आपल्याला अंधारातच राहावं लागतं !

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**२ एप्रिल :** डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी योग प्रमाणन मंडळाद्वारे प्रमाणित द्वितीय स्तराच्या योग प्रशिक्षक म्हणून, व्यक्तिमत्त्व विकासासाठी योग या विषयावर श्री अंबिका योग कुटीर, ठाणे तर्फे प्रथम स्तराच्या योग प्रशिक्षकांसाठी ऑनलाइन सत्र आयोजित केले.




**८ एप्रिल :** बी एन बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) द्वारे सुरू केल्या जाणाऱ्या नवीन अभ्यासक्रमांच्या चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी आयोजित केलेल्या बोर्ड ऑफ स्टडीज (BOS) च्या ऑनलाइन बैठकीला डॉ. पल्लवी चंदवासकर, मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू नामनिर्देशित सदस्य म्हणून उपस्थित राहिल्या आणि आपले योगदान दिले.




**१२ एप्रिल :** डॉ. कांचन आणि प्रा. सिद्धेश यांना, जी एन व्ही एस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटने पदवीसाठी शाखा (स्पेशलायझेशन) कसे निवडावे आणि सायकोमेट्रिक चाचणी कशी आयोजित करावी या विषयावरील सत्र आयोजित करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले.



**१३ एप्रिल :** डॉ. व्ही. एन. ब्रिम्स च्या सी एस आर समिती तर्फे स्वच्छता मोहिमेचा एक भाग म्हणून स्वच्छता फेरी चे आयोजन करण्यात आले. या वेळी ब्रिम्सच्या विद्यार्थ्यांनी 'स्वच्छ भारत' प्रतिज्ञा घेतली. सौ. अपर्णा बेडेकर या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिल्या.






**१५ एप्रिल :** डॉ. नीतिन जोशी यांना लाला लजपत राय इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

**१६ व १७ एप्रिल :** रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालया तर्फे 'सार्वजनिक ग्रंथालयांच्या संचालकांसाठी दिशा-दर्शन शिबिर' आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये ग्रंथालयाशी निगडित विविध विषय म्हणजेच 'सामाजिक जीवनात सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान व बदलत्या

काळातील भूमिका, ग्रंथाचे जतन आणि संवर्धन, माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने वाचनालयांची उपक्रमशीलता, सार्वजनिक ग्रंथालयाचे आधुनिकीकरण व व्यवस्थापन, ग्रंथांचे डिजिटायझेशन आणि उपयुक्तता, सार्वजनिक ग्रंथालये व संगणकीकरण' अशा विविध विषयांवर दोन दिवसांचे दिशा मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरासाठी महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांचे ४० ते ४५ प्रतिनिधी व ग्रंथालय सेवक वर्ग सहभागी झालेले होते. या शिबिरामध्ये सार्वजनिक ग्रंथालये व संगणीकरण या विषयावर ग्रंथालयात 'कोहा' या संगणक प्रणालीचा वापर कसा करायचा व त्याची उपयुक्तता याविषयावर मार्गदर्शन करण्यासाठी ब्रिम्सचे ग्रंथपाल श्री. संजय सपकाळ यांना आमंत्रित करण्यात आले.



**१८ आणि १९ एप्रिल :** सहाय्यक प्राध्यापक प्रथमेश उ. तावडे, एम्पॉवरिंग रिसर्चर्स विथ चाट जी पी टी फॉर रायटिंग असिस्टन्स या विषयावरील दोन दिवसीय ऑनलाइन कार्यशाळेला उपस्थित राहिले.



NPS/WP/CGPT/2023/3021

Nuhianwali Education Society

Nuhianwali Public School, Nuhianwali, Sirsa (Haryana) India

Certificate of Participation

It is certified that **Mr. Prathmesh U Tawade, Assistant Professor** from **Dr. V. N. BRIMS, Maharashtra** has attended successfully a training workshop on **"Empowering Researchers with Chat GPT for Writing Assistance"** through online mode on 18th and 19th April, 2023 organized by **Nuhianwali Education Society**.

(Dr. Kulwant Singh)
**Coordinator/Resource Person**
https://bit.ly/NPSNuhianwali

(Vakil Godara)
**President, Nuhianwali Education Society**
https://bit.ly/Nuhianwali

**२४ एप्रिल :** सहाय्यक प्राध्यापक प्रथमेश उ. तावडे, एस आय इ एस (नेरुळ) कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, एन आय पी ए एम, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'सृजन- ट्रान्सफॉर्मिंग आयडिआज टू पेटंट्स फॉर कॉमर्स अँड आयटी फॅकल्टीज' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारला उपस्थित राहिले.



SIES(Nerul) College of Arts, Science and Commerce
(IQAC, Department of Economics and Department of Commerce)
and
Rajiv Gandhi College of Arts, Commerce, and Science, Vashi
In association with
University of Mumbai and Indian Patent and Trade Marks Office, Mumbai; National Intellectual Property Awareness Mission (NIPAM), Government of India
Organizes "*Srujan*- Transforming Ideas to Patents for Commerce and IT Faculties"

CERTIFICATE OF PARTICIPATION

This certificate is presented to
Mr. Prathmesh U Tawade
from Dr. VNBRIMS
for attending the National Webinar "*Srujan*- Transforming Ideas to Patents for Commerce and IT Faculties" held on 24th April 2023.

Mr. Basukinath. S. Pandey
Principal, Rajiv Gandhi College of Arts, Commerce and Science

Dr. Koel Roychoudhury
Principal, SIES(Nerul) College of Arts, Science and Commerce

**२८ एप्रिल ते ३० एप्रिल :** ब्रिम्स मध्ये एम. एम. एस. अभ्यासक्रमासाठी एन.बी.ए. च्या मान्यताप्राप्तीसाठी एन.बी.ए. तज्ज्ञ समितीने भेट दिली.





## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

**दिनांक ०१ मार्च ते ०३ मार्च २०२३** रोजी महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागाने "PLC, DCS SCADA for Industrial Application" या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेला विद्युत अभियांत्रिकी विभागातील ४० व इन्स्टुमेंटेशन अभियांत्रिकी विभागातील ०५ विद्यार्थी सहभागी झाले होते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री.बी.एस.व्ही.जी शर्मा यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून यावेळी आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाने उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांच्या मिनी आणि मेगा प्रोजेक्टसाठी ही कार्यशाळा फायदेशीर ठरली.






**दिनांक ०८ मार्च २०२३** रोजी नियोजित निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. सदर स्पर्धा महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार अभियांत्रिकी विभाग आणि संस्थेच्या इनोव्हेशन कौन्सिल (IIC) च्या सहकार्याने आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील एकूण अठरा विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या स्पर्धेत युवा सक्षमीकरणापासून आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंतचे विषय ठेवण्यात आले होते. यावेळी विद्युत अभियांत्रिकी विभागातील कु. रोहित पंडम याने 'राष्ट्र उभारणीत तरुणांची भूमिका' या विषयावरील निबंधासाठी प्रथम पारितोषिक पटकावला. त्यानंतर प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातील कु. समी डबीर याने 'राष्ट्र उभारणीत तरुणांची भूमिका' या निबंधासाठी द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार अभियांत्रिकी विभागातील कु. भक्ती दिलीप पवार हिला 'माझ्या स्वप्नातील भारत' या निबंधाकरिता या स्पर्धेत तृतीय पारितोषिक प्राप्त झाले.

### महाविद्यालयातील विद्यार्थांची १००% प्लेसमेंट: नामांकित कंपन्याकडून अंतिम वर्षातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्र

महाविद्यालयातील विद्यार्थांच्या सर्वांगीण विकासासाठी दरवर्षी नावीन्यपूर्ण विविधांगी उपक्रम राबविण्यात येत असतात. यामध्ये MOC's Test च्या माध्यमातून पूर्वतयारी करून घेण्यात येते. तसेच संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांचे विशेष मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात येते. याचप्रमाणे भाभा अणुसंशोधन केंद्रातील निवृत्त ज्येष्ठ शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येते. त्याचप्रमाणे देशातील नामांकित संस्था व कंपन्यांमध्ये अर्थात भाभा अणुसंशोधन केंद्र, इस्रो, आकाशवाणी केंद्र, जम्मू कार येथील कोकण रेल्वे प्रोजेक्ट या सारख्या विविध नामांकित ठिकाणी अभ्यास क्षेत्र भेटी आयोजित केल्या जातात. तसेच विविध नामांकित संस्थांसोबत महाविद्यालयाने सामंज्यस करार केले आहे. याचा फायदा निश्चितच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना होत आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांकरिता इंटरशिप, अप्रेंटशिप प्रोग्रॅम राबविण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांकरिता विविध प्रकारच्या राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केल्या जातात. विद्यार्थ्यांनी बनविलेले संशोधन पेपर नॅशनल कॉन्फरन्समध्ये

प्रकाशित करण्यात येते. अशाप्रकारे पोषक शैक्षणिक वातावरण महाविद्यालयातर्फे निर्माण होत असल्याने याचा निश्चितच फायदा विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीसाठी होताना दिसतो. याचेच उत्तम उदाहरण म्हणजे यावेळी विविध कंपन्यांच्या माध्यमातून महाविद्यालयातील नियुक्त झालेले १००% प्लेसमेंटयुक्त विद्यार्थी होय. यावेळी काही विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन ते तीन कंपन्यांकडून नोकरीच्या संधीही प्राप्त झाली आहे.

**दिनांक २४ मार्च ते ३१ मार्च २०२३** या कालावधीत महाविद्यालयाचा वार्षिकोत्सव 'सप्तक २०२३' दिमाखात साजरा झाला. महाविद्यालयाच्या सात दिवस चाललेल्या या वार्षिकोत्सवा मध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, विविध डेज यासारख्या विविध स्पर्धांचा समावेश होता. विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांना सादर करण्याची संधी लाभली. नृत्य, गायन, अभिनय, क्रीडा स्पर्धांतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव तर मिळतोच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडणही होते. महाविद्यालयात याच महोत्सवांच्या माध्यमातून मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकाससुद्धा होत असून शिस्त, कार्यक्रमांचे आयोजन आणि व्यवस्थापन याची पुरेपूर माहिती विद्यार्थ्यांना या माध्यमातून मिळण्यासाठी महाविद्यालयाने हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. यावर्षीही या वार्षिकोत्सवाचे संपूर्ण आयोजन व नियोजन महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदने केले. यामध्ये मिस व मिस्टर एमपीसीओई हा किताब यावर्षी अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी विभागातील कु. भक्ती पवार व विद्युत अभियांत्रिकी विभागाचा कु. शोहेब तदवाई यांना मिळाला. त्याचप्रमाणे क्रीडा व सांस्कृतिक प्रकारामध्ये मुले व मुलींमधून स्वतंत्ररित्या जास्तीच जास्त पदकांची लयलूट करणाऱ्या विभागास फिरते चषक देण्यात येते. या फिरत्या चषकाचा मान यंदा मुलांमधून विद्युत अभियांत्रिकी विभागास मिळाला. तर मुलींमधून स्थापत्य अभियांत्रिकी विभागास देण्यात आले. त्याचप्रमाणे विविध सांघिक व वैयक्तिक स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह आणि इतर विविध बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विविध प्रकारच्या एकूण तेरा खेळांचा समावेश होता. कॅरम, टेबल टेनिस, बुद्धिबळ, मुलींच्या क्रिकेट स्पर्धा, गायन, रांगोळी, स्केचिंग व स्नेहसंमेलन या विविध कार्यक्रमांनी हा वार्षिकोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सदर वार्षिकोत्सव कार्यक्रम विद्या प्रसारक मंडळ ठाणेचे चेअरमन डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा. योगेश काटदरे, क्रीडा विभागाचे समन्वयक प्रा. औदुंबर पाटकर, विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष सागर जड्यार, सेक्रेटरी रोहित पंडम व इतर सहकारी आणि सर्व विभागप्रमुख यांचे विशेष सहकार्य लाभले.







महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने 'रेविट आर्किटेक्चर' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. बांधकाम क्षेत्रामध्ये रेविट आर्किटेक्चरचा वापर आर्किटेक्ट्स आणि इतर इमारत व्यावसायिकांकडून बांधकाम सुरू होण्यापूर्वी इमारती कशा प्रकारे उभ्या करायच्या व चांगल्या दर्जाचे डिझाईन विकसित करण्यासाठी व प्रकल्प वितरणास सुलभता आणण्यासाठी या आज्ञावलीचा वापर केला जातो. रेविट हे संपूर्ण पायाभूत सुविधांच्या जटिल प्रकल्पांचे प्रश्न सोडवून कार्यकुशल डिझाईन प्रक्रिया चालविण्यास मदत करणारी आज्ञावली म्हणून ओळखली जाते. थ्रीडी व्हिज्युअलायझेशन टूल्समुळे इंटिरियर डिझाईन हे अधिक व्यापक झाले आहे. रेविट आर्किटेक्चरद्वारे खर्च आणि प्रकल्प पूर्णत्वाचा अचूकपणे मागोवा घेण्यास ही आज्ञावली अधिक उपयुक्त ठरते. यामुळे प्रकल्पांवर वेळ वाचतो आणि मानवी त्रुटी कमी होते. या कार्यशाळेत महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थांनी सहभाग नोंदविला.

### 'शक्तिरूपेण संस्थिता' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा



**सदर पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करताना**

महाविद्यालयाचा पदवी प्रदान सोहळा नुकताच महाविद्यालयाच्या नाना फडणवीस सभागृह मध्ये संपन्न झाला. यंदाचे हे सातवे वर्ष होते. महाविद्यालयातील मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इंस्ट्रूमेंटेशन, इलेक्ट्रॉनिक व टेलिकम्युनिकेशन आणि स्थापत्य अभियांत्रिकी या शाखांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबई विद्यापीठाच्या निर्देशानुसार या पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रशांत पटवर्धन (अध्यक्ष- फेडरेशन ऑफ रत्नागिरी जिल्हा चेंबर ऑफ कॉमर्स) यांनी यावेळी प्रतिपादन केले की, 'या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक शिक्षणाबरोबरच एक आदर्श अभियांत्रिकी बनण्याची पात्रता व कौशल्य निर्माण केल्याचा मला आनंद वाटत आहे.' त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी एक जबाबदार नागरिक बनून राष्ट्र निर्मितीमध्ये योगदान देण्याचे आवाहन केले. यावेळी विद्या प्रसारक मंडळाच्या परंपरेनुसार विद्यार्थ्यांना पुणेरी पगडी, उपरणे व विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयक परीक्षा विभागाचे प्रमुख प्रा. नंदकिशोर चौगुले यांनी काम पाहिले. यावेळी विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी अभय मराठे, ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य डॉ. सुधाकर आगरकर, जिंदाल उद्योग समूहाचे सदस्य अनिल ददीच, प्रसाद वैद्य, तसेच महाविद्यालयाच्या विविध विभागांचे विभागप्रमुख, उपप्राचार्य प्रा. अविनाश पवार, प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश दिवे यांनी केले.




### महाविद्यालयाचे वार्षिक पुरस्कार जाहीर

महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा वार्षिक गुणगौरव सोहळा नुकताच पार पडला. यावेळी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील गुणवंत विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. दरवर्षीप्रमाणे

महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर देण्यात येणाऱ्या पारितोषिकामध्ये पुढील विद्यार्थ्यांचा समावेश होता. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा प्रथम वर्ष अभियांत्रिकीसाठी श्री. जयंत कयाळ यांच्या सौजन्याने कै. नारायण श्रीराम कयाळ रोख रक्कम दहा हजार पारितोषिकामध्ये विद्युत अभियांत्रिकी विभागाचा कु. महमद नाबील लांडगे हा विद्यार्थी पात्र ठरला. तसेच महाविद्यालयातून अंतिम वर्षात प्रथम आलेला इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभागाचा कु. सत्यम गणेश निगम याला डॉ. भालचंद्र दीक्षित आणि कुटुंबीय यांचेकडून देण्यात येणारे कै. माधव गणेश दीक्षित रोख रक्कम दहा हजार हे पारितोषिक प्राप्त झाले. तर अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात महाविद्यालयातून विद्यार्थिनीं मधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस श्रीमती अवंतिका गोरे पारितोषिक रोख रक्कम पाच हजार रुपये आणि कै. राधाबाई व दामोदर केशव गोखले पारितोषिक रोख रक्कम पाच हजार या दोन्ही पारितोषिकांवर स्थापत्य अभियांत्रिकी विभागाची कु. वीणा जयप्रकाश साळवी हिने नाव कोरले.




दि. ५ एप्रिल २०२३ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाने तारापूर अणुऊर्जा केंद्र युनिट ३ आणि ४ येथे एक दिवसीय औद्योगिक भेटीचा अभ्यास दौरा केला. यावेळी विद्युत विभागातील तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी या अभ्यास दौरात सहभाग नोंदविला. आपल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी पाठ्यपुस्तक आणि वर्गातील शिकवणी सोबतच अनेक असंख्य उपक्रम राबवण्यात सदर अभियांत्रिकी महाविद्यालय कायमच अग्रेसर राहिलेले आहे. प्रस्तुत भेट ही त्याच उपक्रमाचा एक भाग आहे. सुरुवातीला विद्यार्थ्यांना त्याठिकाणी ॲनिमेटेड व्हिडीओ आणि पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून तारापूर अणुऊर्जा प्रकल्प, एकूणच अणुऊर्जा म्हणजे काय, त्याद्वारे वीज कशी निर्माण केली जाते याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना तारापूरच्या अणुऊर्जा प्रकल्पाचे एक प्रोटोटाइप मॉडेल दाखवण्यात आले. तसेच डॉ. होमी भाभा यांच्यावरील डॉकेमेंटरी सुद्धा दाखवण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना अणुऊर्जा प्रकल्पाची कंट्रोल रूम, टर्बाईन आणि जनरेटर सिस्टीम इत्यादी अतिशय सविस्तर आणि इत्यंभूतरित्या दाखवले गेले. सर्वात शेवटी विद्यार्थ्यांना गॅस इन्सुलेटेड हायटेन्शन (उच्चदाब) स्वीटचार्ड दाखवण्यात आले. गॅस इन्सुलेटेड स्वीचयार्डचे फायदेही समजावून सांगितले गेले. तिथे तारापूरच्या अणुऊर्जा प्रकल्प कंपनीकडून श्री. प्रशांत राऊत हे समन्वयक आणि मार्गदर्शक म्हणून लाभले. सदर अभ्यास दौराच्या यशस्वीतेकरिता विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी आणि विद्युत विभागप्रमुख श्री. सतिश घोरपडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या अभ्यास दौरात विद्युत अभियांत्रिकीच्या तृतीय आणि चतुर्थ वर्षाच्या एकूण ३८ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.



**केरळ येथे औद्योगिक अभ्यास दौरा:** महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभाग तसेच इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाचा सहभाग.




**Industrial visit by Keltron Kerala State Electronics Company**




**Vikram Sarabhai Space Center, Thiruvananthapuram, Kerala**

### महाविद्यालयातील प्रा. भारत पवार यांना पेटंट मिळविण्यात यश.

दिनांक १६ एप्रिल २०२३ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभागातील प्रा. भारत पवार यांनी 'Artificial Intelligence' चा उपयोग करून 'उमेदवारांची मुलाखत व निवड प्रक्रिया सुलभ आणि गतिमान करण्याची सोपी पद्धत व कार्यप्रणाली' या विषयावर पेटंट मिळविण्यात यश प्राप्त झाले आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून, ज्यात मुलाखत व उमेदवारांची निवड प्रक्रिया कशाप्रकारे जलद आणि मनुष्यविरहीत होईल ते सांगण्यात आले आहे. सदर पेटंट 'इंडियन पेटंट' या नियतकालिकेत प्रकाशित झाले.

### महाविद्यालयात अक्षयतृतीया व महर्षी परशुराम जन्मोत्सव साजरा.





### महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. गणेश दिवे यांचे एक चॅप्टर पुस्तकात प्रकाशित.

महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ. गणेश दिवे यांचा 'Leadership Essentials for the Implementation of NEP-2020 in Higher Education' या विषयावरील एक चॅप्टर 'Implementation of National Education Policy-2020: Challenges and Opportunities for Rural Colleges in India' हा या पुस्तकात पान नं. ८५- ८६ वर प्रकाशित झाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

•••

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)

संबोधतात आणि मानाने वागवितात. एकदा ते बरे होऊन बाहेर गेले, की आमची एकदाही विचारपूस करीत नाहीत! प्रकल्पातील एका मुलाने रेल्वे फलाटावर काम करणाऱ्या एका हमालाची मुलाखत घेतली. अनेक प्रश्न विचारून त्या व्यक्तीची आणि हमाली व्यवसायाची सखोल माहिती त्यांनी मिळविली. शेवटी त्यांची चर्चा पुढच्या पिढीच्या भविष्यावर येऊन ठेपली. तेव्हा हमालाने असे सांगितले की, 'जे काम माझ्या नशिबी आले ते माझ्या मुलाच्या नशिबी येऊ नये यासाठी मी माझ्या मुलाला चांगल्या शाळेत घातले आहे.'

फावल्या वेळेत करावयाच्या कामातील एक काम आहे सर्वेक्षणाचे. सर्वेक्षण हे माहिती मिळविण्याचे उत्तम साधन आहे. सरकारी आणि खासगी पातळीवर अनेक प्रकारची सर्वेक्षणे केली जातात. त्यांचा अनुभव मुलांना मिळावा यासाठी त्यांना उन्हाळी सुट्टीत सर्वेक्षण करण्याचे काम देण्यात आले. त्यासाठी काही विषय सुचविण्यात आले होते. परंतु विषय निवडण्याचे स्वातंत्र्य मुलांना देण्यात आले होते. एका मुलीने भाजीच्या भावाचे सर्वेक्षण केले. आईसोबत भाजीबाजारात जाऊन वेगवेगळ्या भाज्यांचे दर ती माहीत करायची आणि त्यांची नोंद करून ठेवायची. आठवडाभर भाज्यांचे भाव थोडेफार कमीजास्त होतात हे तिच्या लक्षात आले. एकदा ती बाजारात गेली असता भाज्यांचे भाव गगनाला भिडले असल्याचे तिच्या लक्षात आले. 'असे का?' याची तिने चौकशी केली तेव्हा तिला कळले की मुंबईत येणारा भाजीपाला प्रामुख्याने नाशिक परिसरातून येतो. नाशिकवरून रात्री निघालेले ट्रक पहाटेपर्यंत मुंबईला पोहोचतात. त्या दिवशी मात्र कसारा घाटात अपघात झाला असल्याने ट्रक्स वेळेवर पोहोचले नाहीत. त्यामुळे भाज्यांचे भाव वाढले आहेत. अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना 'मागणी आणि पुरवठा' यातील परस्पर संबंध शिकविले जातात. हा संबंध त्या मुलीला अनुभवातून चांगला समजला होता. तिच्या एका सहकाऱ्याने त्यांच्या चाळीतील अपंगत्व असलेल्या व्यक्तींचे सर्वेक्षण केले. त्याच्या असे लक्षात आले की, त्यांच्या वस्तीत अपंग मुलांची संख्या खूपच आहे. त्यांच्याकडे लक्ष द्यायला त्यांच्या पालकांना वेळ नाही. त्यामुळे अशा मुलामुलींकडे दुर्लक्ष होते. या बाबतीत सरकारने आणि स्वयंसेवी संघटनांनी लक्ष देण्याची गरज आहे असे आग्रही मत त्याने मांडले.

फावल्या वेळेचा सदुपयोग करून घ्यायचा असेल तर पालकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. आपल्या पाल्याला कोणत्या क्षेत्रात गती आहे याची त्यांनी माहिती करून घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर कोणते अनुभव मुलांना दिल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वात योग्य तो बदल होईल याची देखील जाणीव पालकांना असणे आवश्यक असते. अशिक्षित किंवा अल्पशिक्षित पालकांना असे ज्ञान असण्याची शक्यता कमी आहे. अशावेळी शाळांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. सुट्टी सुरू होण्यापूर्वी सुट्टी कशी उपयोगात आणावी याचे मार्गदर्शन शाळेने देणे गरजेचे आहे. तसेच, सुट्टी संपल्यावर 'मुलांनी सांगितलेली कोणकोणती कामे केली?' याची नोंद घेणे आवश्यक आहे. शाळेबरोबरच स्वयंसेवी संघटनांनी या कामात लक्ष घालणे गरजेचे आहे असे मला वाटते. समंजस समाज घडविण्यासाठी या बाबीं अतिशय महत्त्वाच्या आहेत. आज आपण विद्यार्थी घडविण्यासाठी जे प्रयत्न करू त्यातूनच उद्याचा भारत घडणार आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.